जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# अपहरण करून युवकावर अनैसर्गिक अत्याचार; जिवे मारण्याचा प्रयत्न; १२ जणांवर गुन्हा दाखल

### केडगाव बायपास रोडवरील नेप्ती मार्केटजवळील घटना

नगर - केडगाव मध्ये मित्राच्या घरात झोपलेल्या १६ वर्षीय युवकाला १२ जणांच्या टोळक्याने घराचा दरवाजा तोडून बळजबरीने उचलून स्कॉर्पिओ गाडीत बसवून केडगाव बायपास रोडवर नेप्ती मार्केट शेजारील मोकळ्या जागेत नेले. तेथे त्याला मारहाण करत त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार केला. त्यानंतर त्याचा कापडी पंचाने गळा आवळून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना १४ एप्रिल रोजी मध्यरात्री घडली. विशेष म्हणजे या अत्याचाराचे आणि मारहाणीचे व्हिडीओ या आरोपींनी त्यांच्या मोबाईल मध्ये काढले.

बीड च्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येसारखा प्रकार केडगाव मध्ये घडला आहे. मात्र या जीवघेण्या हल्ल्यातून सदर युवक सुदैवाने वाचला आहे. त्याने १७ एप्रिल रोजी याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून केडगाव उपनगरातील एकनाथनगर येथील रावण साम्राज्य ग्रुपचा अध्यक्ष मयूर अनिल आगे, अबुजर राजे, शाहरुख अन्सार पठाण, आदित्य प्रशांत सोनवणे, अजय किशोर शिंदे, ओमकार उर्फ भैया राहिंज, रोहीत पंडागळे, सोनू बारहाते, ऋषिकेश सातपुते, रोहीत कोल्हे, अतिफ शेख, सौरभ गायकवाड (सर्व रा. केडगाव) यांच्या विरुद्ध जीवे मारण्याचा प्रयत्न, अपहरण, अनैसर्गिक अत्याचार, पोक्सो, मारहाण अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी युवक हा १४ एप्रिल रोजी रात्री १०.३० च्या सुमारास डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक संपल्यावर त्याच्या मित्राच्या नेप्ती रोडवरील घरी गेला होता. रात्री ११.३० च्या सुमारास सर्व आरोपींचे टोळके स्कॉर्पिओ व मोटारसायकल वर तेथे आले. त्यांनी घराचा दरवाजा तोडून फिर्यादी, त्याचा मित्र व त्याच्या वडिलांना मारहाण केली. फिर्यादी युवकाला घराबाहेर रस्त्यावर ओढत आणून मारहाण करत त्याला व मित्राला स्कॉर्पिओ मध्ये बसविले. त्याला घेवून केडगाव बायपास रोडवर नेप्ती मार्केट शेजारील मोकळ्या जागेत नेले. काही वेळात तेथे मोटार सायकल वर काहीजण आले.

त्यातील एकाने याला मारण्याअगोदर त्याचा व्हिडीओ काढू असे म्हणत फिर्यादीला बळजबरी करत बोलायला लावले की, ओमकार राहिंज यांची टपरी आम्ही फोडली व मित्राच्या घरी लपून बसलो होतो. असा व्हिडीओ काढून झाल्यावर मयूर आगे याने फिर्यादीला कपडे काढायला लावले. त्यास नकार देताच ओमकार राहिंज याने त्याच्या गळ्याला कोयता लावत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर घाबरून फिर्यादीने कपडे काढल्यावर त्यातील ३ -४ जणांनी फिर्यादी वर अनैसर्गिक अत्याचार केला. त्यांच्या इतर साथीदारांनी या सर्व प्रकारचे व्हिडीओ शुटींग केले.


### मेल्याचा समज झाल्याने आरोपी निघून गेले

त्यानंतर अजय शिंदे म्हणाला की याला आता जिवंत सोडता कामा नये, असे म्हणत त्याने फिर्यादी वर कोयत्याने वार केला, मात्र तो चुकला. त्यावेळी एकजण म्हणाला अरे याला कोयत्याने मारले तर आपल्याला पोलिस लगेच पकडतील, त्यामुळे याचा गळा आवळून मारू असे म्हणताच २-३ जण पुढे आले, त्यांनी कापडी पंचाने गळा आवळून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादी बेशुद्ध पडल्यावर तो मेला असा समज झाल्याने आरोपी तेथून निघून गेले. त्यानंतर १५ एप्रिल रोजी सकाळी ६ च्या सुमारास फिर्यादी युवक शुद्धीत आला. त्याने आपले कपडे घातले आणि घरी गेला. त्याच्या आईने त्याला काय झाले असे विचारले, परंतु झालेल्या अत्याचाराने आणि मारहाणीमुळे सदर युवक घाबरून गेला होता. २ दिवसांनी या धक्क्यातून सावरल्यावर त्याने आईला घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर तो आई समवेत १७ एप्रिल रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यास आला. त्याच्या फिर्यादी वरून पोलिसांनी १२ जणांवर बी.एन.एस. २०२३ चे कलम १०९ (१), १४० (१), ९६, ११८ (१), ११५ (२), ३५१ (३), ३५२, १८९ (२) (४) (९), १९१ (१) (२), ३२४, ३३३ सह बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८, १२, १७ प्रमाणे गुन्हा दाखल केला. अधिक तपास स.पो.नि कुणाल सपकाळे हे करीत आहे. गुन्हा दाखल केला आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...





### आम्ही चालवू हा पुढे वारसा...

आज १८ एप्रिल. युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय स्मारके व स्थळे परिषदेतर्फे हा दिवस जागतिक वारसा दिवस म्हणून साजरा केला जातो. याचा मुख्य उद्देश माणसाच्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसाबाबत जागरुकता निर्माण करणे, त्यांच्या हानी व असुरक्षिततेचा विचार करणे तसेच त्यांच्या जतन, संरक्षण व संवर्धनासाठी प्रयास करणे हा आहे.

आपल्या देशाच्या काही सांस्कृतिक, ऐतिहासिक गोष्टींबाबत सर्वांनाच अभिमान असतो अन् असायलाच पाहिजे. परंतु या विषयीचे महत्त्व, जागृती सर्वसामान्य माणसांत फार कमी पाहायला मिळते.

एखाद्या देशाचा वा शहराचा, ठिकाणाचा २ प्रकारे वारसा असू शकतो. एक म्हणजे नैसर्गिक वारसा निसर्ग, पर्वत, डोंगर, नद्या, जंगले, हवामान, प्रादेशिक रचना इ. (उदा.- हम्पी, अजंठा, वेरुळ इइ.)

माणसाने आपल्या ज्या काही क्षमता, कौशल्ये आहेत त्याआधारे जे काही मानवी जीवन घडवले, विकसित केले, नवनिर्मिती केली त्याला आपण मानवी वारसा, संस्कृती म्हणतो. (उदा.- भव्य राजे रजवाडे, ताजमहल, शिल्पे, कलात्मक वस्तू इ.इ.)

आपल्या नगर शहराला अजूनही बऱ्याचदा ऐतिहासिक म्हणून ओळखले जाते. येथील निजामशाहीच्या खुणा अजूनही टिकून आहेत. निघोजची नैसर्गिक कुंडे, अकोला, आदिवासी भागात महादेवाचं (एक खांब शिल्लक) मंदिर, या नैसर्गिक वारसांसह शिंगणापूर, शिर्डी, देवगड, नेवासा, आनंदधाम, अवतार मेहेरबाबा ध्यान मंदिर, व्हीआरडीई संशोधन केंद्र, रणगाडा संग्रहालय यासारख्या मानवीय वारशाने शहराची अस्मिता व वारसा समृद्ध आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात ई-सुनावणीला सुरुवात; या निर्णयामुळे नागरिकांचा वेळ, पैसा व श्रम वाचणार



जिल्हाधिकारी कार्यालयात ई-सुनावणी प्रक्रियेला अपर जिल्हाधिकारी यांच्या दालनात प्रारंभ करण्यात आला आहे.

नगर - जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या अपील प्रकरणांवर ई-सुनावणी प्रक्रियेला अपर जिल्हाधिकारी यांच्या दालनात प्रारंभ करण्यात आला आहे. या माध्यमातून जमीन व मालमत्तेशी संबंधित वाद, हक्क नोंदणी, फेरफार, उताऱ्यावरील दुरुस्ती तसेच मालकी हक्काच्या प्रकरणांवर आता ऑनलाईन पद्धतीने सुनावणी होणार आहे. ई सुनावणीमुळे महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होण्यास मदत होणार आहे.

शासनाकडून संपूर्ण महसूल व्यवस्थेला डिजिटायझेशनच्या दिशेने नेत, 'पेपरलेस व पारदर्शक प्रशासन' देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ई सुनावणी ही नवीन संकल्पना सामान्य नागरिकांसाठी हितकारक आहे. यातून महसूल प्रकरणांवरील निर्णय जलदगतीने होऊन कामकाजात अधिक आणि सुसूत्रता येईल. येत्या काळात तालुका कार्यालयांमध्येही ही सेवा कार्यान्वित करण्यात येणार असून, नागरिकांना त्यांच्या घरी बसूनच न्याय मिळवण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले. आता पक्षकारांना तसेच विधिज्ञांना जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार येण्याची गरज नाही. ई-सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतली जाणार असल्याने घरबसल्या आपले म्हणणे मांडता येईल. यामुळे वेळ, प्रवासाचा खर्च व श्रम वाचण्यास मोठी मदत होणार आहे. शिवाय पारदर्शकपणे आणि वेळेत निर्णय देणे यामुळे शक्य होणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यावेळी म्हणाले.

# चाकूने केलेल्या हल्ल्यात युवक गंभीर जखमी

### मुकुंदनगर परिसरातील घटना, तिघांवर गुन्हा दाखल

नगर - आमची बदनामी काम करतोस असे म्हणून तिघांनी शिवीगाळ दमदाटी करीत, हाताच्या चापटीने लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन चाकूने पोटात वार केला. ही घटना मुकुंदनगर येथील इकरा हायस्कूलच्या मागील गेट जवळ १७ एप्रिल रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली.

या बाबत शब्बीर सल्लाउद्दीन शेख (वय २०, रा.दरबार चौक, मुकुंदनगर) याने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की कासिफ आसिफ शेख, सलमान पिंजारी, आणि एक अनोळखी इसम (तिघे रा. मुकुंदनगर) यांनी शब्बीर शेख याला आमचे सोबत चल आम्हाला थोडे बोलायचे आहे असे म्हणून इक्रा हायस्कूल मागचे गेट जवळ नेले. तेथे गेल्यावर कासिफ शेख म्हणाला तू आमची बदनामी का करतोस असे म्हणून तिघांनी शिवीगाळ दमदाटी करीत हाताच्या चपटीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. कासिफ शेख याने कमरेला लावलेल्या चाकूने फिर्यादीच्या पोटात खुपसून त्यास गंभीर जखमी केले.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी शब्बीर शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (१), ११५ (२), ३५१ (२) (३), ३५२, ३, (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलिस हवालदार अंकुश कासार हे करीत आहेत.

## विष्णु कुलकर्णी यांचे हृदयविकाराने निधन



नगर - निर्मलसृष्टी गोपालन संस्थेचे व्यवस्थापक विष्णु रामचंद्र कुलकर्णी (वय ४४) यांचे १७ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले असा परिवार आहे. क्षितीज व ऋग्वेद यांचे ते वडील होत.

## रविंद्र बर्डे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - बुऱ्हाणनगर येथील रहिवासी रविंद्र नानासाहेब बर्डे (वय ७२) यांचे १७ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर बुऱ्हाणनगर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, पत्नी, सुना, २ नातू असा परिवार आहे. प्रणीत व पियुष बर्डे यांचे ते वडील होत.

## बाबूलाल पांडे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील बाबूलाल रतनलाल पांडे (वय ९४) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अशोक, दिलीप, किशोर, सुनिल व जितेंद्र पांडे यांचे वडील होत.

## गिरजाबाई अनुष्ठान यांचे वृद्धपकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील गिरजाबाई शंकर अनुष्ठान (वय ९०) यांचे वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. श्रीरामपूर येथील बस स्थानकात वृत्तपत्र पार्सल टाकणारे नामदेव अनुष्ठान यांच्या त्या मातोश्री होत.

## नारायण सांगळे यांचे हृदयविकाराने निधन

आष्टी - तालुक्यातील कर्हेवाडी येथील रहिवासी नारायण आबा सांगळे (वय ५५) यांचे १५ एप्रिल रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते यात्रेनिमित्त गावी आले होते. त्यांना अचानक पहाटे झोपेतच हृदयविकाराचा धक्का बसला. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. नारायण सांगळे हे पारनेर तालुक्यातील पळशी येथील आश्रम शाळेवर सेवेत होते. तत्पूर्वी त्यांनी नाबार्ड पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पामध्ये पाणलोट सेवक म्हणून ६ वर्षे काम केले.

## विमलबाई सुर्यवंशी यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील श्रीरामपूर नगरपरिषदच्या सेवानिवृत्त कर्मचारी विमलबाई नवलसिंग सुर्यवंशी (वय ६५) यांचे डी.वाय.पाटील हॉस्पिटल, पुणे येथे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुन, दिर, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मेनरोड येथील वरद इडली सेंटरचे मालक वाल्मिक सुर्यवंशी यांच्या मातोश्री, पटेल हायस्कूलचे शिपाई भिकन सुर्यवंशी यांच्या भावजई होत.



# भरधाव वेगातील टेम्पोच्या धडकेत महिलेचा मृत्यू

### नगर-दौंड रोडवर रस्ता ओलांडताना झाला अपघात

नगर - पायी रस्ता ओलांडणाऱ्या ४१ वर्षीय महिलेस भरधाव वेगात अरणगावकडून नगरकडे येणाऱ्या टेम्पोने धडक दिली. या धडकेत महिला गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाली. ही घटना नगर-दौंड रोडवरील अजय गॅस गोडाऊन, पेट्रोल पंपासमोर १७ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली.

संगिता निवृत्ती पुलाटे (वय ४१, रा. वीटभट्टी जवळ, कायनेटिक चौक) असे मृत महिलेचे नाव आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, मयत संगिता पुलाटे या अजय गॅस गोडाऊन जवळील पेट्रोल पंपासमोर पायी रस्ता ओलांडत असताना अरणगावकडून भरधाव वेगात आलेल्या टेम्पोने त्यांना जोरात धडक दिली. या धडकेत पुलाटे या गंभीर जखमी झाल्या. त्यांना त्यांचे पती निवृत्ती काशिनाथ पुलाटे यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून त्या उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

त्यानंतर १८ एप्रिल रोजी दुपारी निवृत्ती पुलाटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी टेम्पोचालक निलेश भाऊसाहेब पठारे (रा. पाण्याच्या टाकीजवळ, विळद, ता.नगर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# विहिरीच्या पाण्यात बुडून ४५ वर्षीय इसमाचा मृत्यू

नगर - नगर तालुक्यातील वडगाव तांदळी गावच्या शिवारात ठोंबरे यांच्या शेतातील विहिरीत पडून पाण्यात बुडून एका ४५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृत्यू झाला आहे. या मयताची ओळख पटलेली नसून पोलिस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

वडगाव तांदळी शिवारात ठोंबरे यांच्या विहिरीत ३ एप्रिल रोजी एक इसम पाण्यावर तरंगताना आढळून आला होता. त्याला विहिरीतून बाहेर काढून जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.वाघ यांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले होते. तसा अहवाल नगर तालुका पोलिसांना दिला. त्यानुसार पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या अनोळखी मयताची ओळख पटविण्यासाठी नगर तालुका पोलिसांना सहाय्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माहितीसाठी तपासी अंमलदार सचिन वणवे यांच्याशी (मो. ८७६६८९०७०१) यावर संपर्क साधावा.

## गिरीश शेटे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - आशा टॉकीज रोड येथील रहिवासी गिरीश बाळकृष्ण शेटे (वय ६२) यांचे १० एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, २ पुतणे असा परिवार आहे. ते हॉटेल सवेरा समोरील स्वस्तिक गादी कारखान्याचे संचालक होत.

## नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांची नगरमध्ये २० एपिल रोजी सभा

नगर - नगर अर्बन बँकेच्या हातघाईवर आलेल्या व संयमाचा अंत झालेल्या काही त्रस्त ठेवीदारांनी मागणी केल्यानुसार सर्वच ठेवीदारांची सभा २० एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता गायत्री मंदिर सभागृह, महाजन गल्ली, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

सभेसाठी सर्व ठेवीदारांनी हजेरी लावावी. यानंतर सभा घेण्यात येणार नाही व व्हॉटस्ॲपवरील अनाठायी सूचनांची दखल घेतली जाणार नाही. सभा वेळेवरच सुरू होईल. वेळेवरच हजर राहावे, असे नगर अर्बन बँक बचाव समितीचे सचिव डी. एम. कुलकर्णी यांनी सांगितले.

## झोपेच्या गोळ्यांचे अतिसेवन केल्याने महिलेचा मृत्यू

नगर - शहरातील सबजेल चौक परिसरात राहणाऱ्या एका महिलेचा मृत्यू झोपेच्या गोळ्यांचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने झाला असल्याचे समोर आले आहे. भावना सतीश उपलांची (वय ३८) असे मयत महिलेचे नाव आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सदरची घटना बुधवारी (१६ एप्रिल) घडली.

भावना उपलांची यांनी झोपेच्या गोळ्यांचे जास्त प्रमाणात सेवन केल्याचे त्यांच्या नातेवाईकांच्या लक्ष्यात येताच त्यांनी उपचारासाठी भावना यांना अहिल्यानगर शहरातील खासगी रूग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरु असताना त्यांचा रात्री मृत्यू झाला. यासंदर्भात संबंधित खासगी रुग्णालयातून मिळालेल्या डेथ मेमोच्या आधारे कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस अंमलदार आनंद दाणी अधिक तपास करीत आहेत.




मोदी सरकारने नॅशनल हेरॉल्ड प्रकरणाचा वापर करून खासदार सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर जी कारवाई केली तिचा निषेध करताना काँग्रेसचे कार्यकर्ते.

# मोदी सरकार जुलमी व हुकूमशाही प्रवृत्तीचे

### काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांची टिका

नगर - मोदी सरकार हे जुलमी व हुकुमशाही प्रवृत्तीचे आहे. ईडीच्या आडून खासदार सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जाणीवपूर्वक द्वेषपूर्ण सूडबद्धीने कारवाई केली जात आहे. याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करतो असे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी म्हटले आहे.

मोदी सरकारने नॅशनल हेरॉल्ड प्रकरणाचा वापर करून खासदार सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर जी कारवाई केली हा प्रकार लोकशाहीला दबावाखाली आणण्याचा प्रयत्न असल्याचे सांगून जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयावर घोषणाबाजी करण्यात आली. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि प्रदेश कमिटीच्या निर्देशानुसार आंदोलन करण्यात आले.

मोदी सरकारचे करायचे काय खाली डोके वर पाय, लोकशाही विरोधात हुकुमशाही पद्धतीने काम करणाऱ्या सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही असे म्हणत ही घोषणाबाजी करण्यात आली. मोदी शासनाने द्वेषपूर्ण भावनेतून ही कारवाई केली आहे. नॅशनल हेरॉल्ड वर बंधने आणून ते लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेचा गळा घोटण्याचा प्रयत्न करत आहेत. वक्फ बोर्डाची जमीन सरकारच्या ताब्यात घेण्याचे षड्यंत्र असून ती धनदांडग्या उद्योगपतींना देण्याचा घाट घालण्यात आला आहे. कोणत्याही समाजाच्या धार्मिक भावना भडकवण्याचा अधिकार सरकारला नाही या बोर्डावर मुस्लिमेतर प्रतिनिधी घेण्याचा कायदा करण्यात आला मग हिंदू धार्मिक स्थळांवर मंदिरांवर मुस्लिम किंवा इतर धर्मीय प्रतिनिधी घेण्याचा विचार सरकार का करत नाही जर आपली लोकशाही धर्मनिरपेक्ष आहे तर हे झालेच पाहिजे. सरकारची धाक दडपशाही आम्ही खपवून घेणार नाही या सरकारला पाय उतार केल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही असे जयंत वाघ यांनी सांगितले.

यात जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रताप शेळके, नगर तालुकाध्यक्ष अरुण म्हस्के, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. अमोल फडके, प्रदेश सचिव संभाजी माळवदे, पाथडी तालुका अध्यक्ष नासिर शेख, शेवगाव तालुका अध्यक्ष समीर काझी, राहुरी तालुका अध्यक्ष बाळासाहेब आढाव, इंटक जिल्हाध्यक्ष राजेंद्र कर्डिले, युवक जिल्हाध्यक्ष मोहसिन शेख, बाळासाहेब भंडारी, भिंगारचे रिझवान शेख, सेवादलाचे जिल्हा उपाध्यक्ष शामराव वागस्कर, नेवासा शहर अध्यक्ष अंजुमभाई शेख, टीडीएफ नेते कोकाटे सर, सौ. शोभाताई पातारे, सौ. मंगल भुजबळ, अभिजीत कांबळे, मयुर पाटोळे आदी उपस्थित होते.

# दुकानाचा पत्रा उचकटून रोख रकमेची चोरी

नगर - बंद दुकानाच्या पाठीमागील बाजूचा पत्रा उचकाटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. आतील सीसीटीव्ही कॅमेरे फिरवून दुकानातील सामानाची उचकापाचक केली. दुकानातील टेबलाच्या ड्रॉवरमध्ये असलेली रोकड चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील धनगरवाडी येथील शुभम ट्रेडर्स नावाच्या फर्निचरच्या दुकानात १६ एप्रिल रोजी रात्री ८ ते १७ एप्रिल च्या पहाटे ३ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत सोपान भिकाजी शिकारे (वय ५८, रा. धनगरवाडी, ता. नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की चोरट्यांनी शुभम ट्रेडर्स फर्निचरच्या दुकानाचा पाठीमागील पत्रा उचकाटून आत प्रवेश केला. आतील सामनाची उचकापाचक करुन सीसीटीव्ही कॅमेरे फिरवून टेबलच्या ड्रावर मधील १ हजार १०० रुपये रोख रक्कम चोरुन नेली.

या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी सोपान शिकारे यांनी दिलेले फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५, ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस हवालदार अनिल आव्हाड हे करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### प्या आवळ्याचा रस

आवळ्याचा रस रिकाम्या पोटी सेवन केल्याने त्याचे पाचक फायदे अधिक होतात. हे पोटातील आम्ल संतुलित करण्यास, आम्लता कमी करण्यास आणि प्रतिबंध करण्यास मदत करते. शिवाय, आवळा रस एक नैसर्गिक रेचक म्हणून कार्य करते, पाचन तंत्र स्वच्छ करण्यास आणि संपूर्ण गॅस्ट्रोइंटेस्टाइनल आरोग्यास प्रोत्साहन देते.

## पाककला

### कैरीची जेली

**साहित्य** : १/२ किलो कैरी, १ वाटी साखर, १ वाटी पुदिन्याची पाने, १/२ चमचा मीठ, १/२ चमचा काळ मीठ, १/२ चमचा मिरेपूड, १ चमचा जिरा पावडर,

**कृती** : सर्वप्रथम कैरी धुवून साल काढून घ्या व बारीक चिरून घ्या. आता एका मिक्सरच्या भांड्यात कैरीचे तुकडे व पुदिन्याची पाने घालून बारीक करून घ्या लागल्यास त्यात थोडं पाणी टाका. कैरी मिक्सरमध्ये बारीक झाल्यानंतर चाळणी मधून गाळून घ्या म्हणजे आपल्याला मऊ असा गर मिळेल व कचरा निघून जाईल. आता त्यात एक वाटी साखर घाला. कैरी जास्त आंबट असेल तर थोडी जास्त साखर घ्या. नंतर त्यात १/२ चमचा मीठ व १/२ चमचा काळ मीठ घाला. १/२ चमचा मिरे पूड व १ चमचा भाजलेल्या जिऱ्याची पूड घाला आणि एकत्र करा. आता एक कढई किंवा पॅन घ्या त्यात हे मिश्रण घाला व मध्यम आचेवर शिजायला ठेवा आणि सतत ढवळत रहा हळूहळू हे मिश्रण घट्ट होईल. आता गॅस मंद करा व त्यात एक चिमूटभर खाण्याचा हिरवा रंग घाला व छान एकत्र करा आणि सतत ढवळत रहा म्हणजे ते मिश्रण छान घट्ट होईल. मिश्रण घट्ट झालं की गॅस बंद करा. नंतर एक ट्रे किंवा ताट घेऊन त्याला थोडं तेल लावा व तयार झालेले मिश्रण त्या ट्रेमध्ये टाका व छान पसरवून घ्या एकसमान करा. आपल्याला त्याची जाडी थोडी जाड ठेवायचं आहे. आता ट्रे किंवा ताट एक पूर्ण दिवस उन्हात ठेवा.

## वास्तू

### माठ ठेवण्यासाठी

मातीचा माठ भरण्यासाठी उत्तर-पूर्व किंवा उत्तर दिशा चांगली मानली जाते. याचे कारण म्हणजे याची दिशा जलचे देवता वरुण देवाची आहे. त्याचबरोबर देवी लक्ष्मीचीही कृपा राहते आणि घरात सुखसमृद्धी निर्माण होते.

## सल्ला

कोथिंबीर टिश्यू पेपरमध्ये ठेवल्याने तिचा ताजेपणा आणि सुगंध टिकून राहतो.

## सौंदर्य

तुपाने मालीश केल्याने त्वचा तेजस्वी तर राहतेच शिवाय हाडे मजबूत होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५

**सौर ग्रीष्मऋतु प्रारंभ, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, मूळ १०|२१, सूर्योदय ०६ वा. २१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३९ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील.

**वृषभ** : आर्थिक नफा चांगला मिळेल. मित्रांची मदत मिळेल.

**मिथुन** : अधिक श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल.

**कर्क** : कौटुंबिक वातावरण सुखद राहील. आर्थिक स्थिती अनुकूल राहिल.

**सिंह** : आज नवीन केलेली सुरुवात शुभ राहिल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या** : कौटुंबिक प्रकरणांमध्ये कोणत्याही प्रकारचे विवाद टाळा.

**तूळ** : मित्रांकडून सहयोग मिळेल. व्यापार-व्यवसायात अनुकुल असेल.

**वृश्चिक** : कामातील एकाग्रता ढळल्याने चूका होतील. नातेवाईक डोके वर काढतील.

**धनु** : व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. जुन्या मित्राशी भेट होण्याची शक्यता.

**मकर** : अडलेली प्रशासकीय कामे पूर्ण होतील.

**कुंभ** : राजकीय व्यक्तींच्या हातात आलेल्या संधी थोडक्यात निसटतील.

**मीन** : जुने मित्र मंडळी भेटतील. उपकरणे बिघडण्याची शक्यता आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


पाहुणे : अजून सांग बेटा पुढे काय प्लान आहे?
बेटा : विशेष काही नाही फक्त आपण गेल्यावर ही शिल्लक राहिलेली बिस्कीटे खाणार आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* वर्ष २०२१ या इंग्रजी भाषेतील साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित केलेले 'थिंग्स टू लिव्ह बिहाईंड' ही कादंबरी कोणी लिहिली आहे? – नमिता गोखले

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१


## शब्दगंध क्र. ७१५८ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) नातेवाईक; आप्त ५) भारतातील एक मोठा राजकीय पक्ष (संक्षिप्त) ८) मळालेला ९) नदीचे उंच तीर; डोंगराची तुटलेली बाजू १०) एक जंगली प्राणी; रानरेडा ११) लक्ष्मी व विष्णू १४) क्रीडा; लीला १५) देवाचे नाव, मंत्र वगैरेचा पुन्हा पुन्हा उच्चार १६) निचरून काढलेला द्रव; दारू १८) वाताहत; बोजवारा २२) रव्यापासून तयार केलेला एक गोड पदार्थ २३) वडिलोपार्जित संपत्तीवरचा हक्कदार; उत्तराधिकारी २४) बाई; स्त्री; नारी २५) झुडपांवर वगैरे सरपटत जाणारा एक छोटा जीव

**उभे शब्द :-** १) मंत्र्याच्या नावाअगोदर लावतात तो सन्मानदर्शक शब्द २) खालचा भाग; बूड ३) जुने फाटके वस्त्र; चिंधी ४) कंपू; ब्लॉक; चमू ५) भाद्रपद महिना ६) ज्याअर्थी ७) एक लांबट फळभाजी १०) गणनायक; गजवदन; गणेश १२) मनुष्य; मानव १३) मला १६) विश्रांती; विराम; विश्राम १७) ओळख; वग; नोकरी वगैरेसाठी लावण्यात येणारा लग्गा १९) पलंग विणण्याची कापडी पट्टी २०) एक वनस्पती २१) ढीग; चळत; चवड

**शब्दगंध क्र. ७१५७ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११८५ चे उत्तर**



# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : तुमचा अपमान करणाऱ्याला उत्तर देत बसू नका. स्वतः प्रामाणिकपणे मेहनत करत रहा, कारण तुमच यश अपमान करणाऱ्यालाही तुमचा सन्मान करायला भाग पाडत.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मठ्ठा आणि ताक यात काय फरक आहे?

ताक आणि मठ्ठा हे दोन्ही दह्यापासून बनवतात. दूध गरम करुन सायीसकट विरजायचे. त्याचे दही तयार झाले की त्यात योग्य प्रमाणात पाणी घालूनते घुसळायचे. घुसळल्यानंतर दह्यातील स्निग्ध पदार्थ लोण्याच्या रुपात वर येतात. लोणी बाजूला काढायचे, जो द्रव शिल्लक राहतो ते म्हणजे ताक. ताकाला संस्कृतमध्ये तक्र म्हणतात. आयुर्वेदात ताकाला बहुगुणी मानले आहे. जेवणानंतर थोडेसे सैंधव आणि हिंग घातलेले ताक प्यायल्यास पचनाची प्रक्रिया सुधारते. उन्हाळ्यात ताक थंडावा देते. ताक विविध प्रकाराने वापरतात. कढी, मठ्ठा, लस्सी इत्यादी. मठ्ठा हा ताकाचाच वेगळा प्रकार आहे, ताकात आलं, मिरची, कोथिंबिर वाटून घालतात. चवीला मीठ घालून केलेले ताक म्हणजे मठ्ठा. आपल्याकडे जेवणात जिलबीबरोबर मठ्ठा असतो.

## दैव

एक मुलगा शेतात खेळता खेळता दमला आणि जवळच एक विहीर होती तिच्या अगदी कडेवर जाऊन निजला.

ते पाहून दैवाने त्यास हळूच हलवून जागे केले आणि म्हटले,

'मुला, मी तुझा जीव वाचविला हे लक्ष्यात ठेव. तू जर आता झोपेत लोळून या विहीरीत पडून मेला असतास तर त्याबद्दल लोकांनी मला दोष दिला असता. पण तूच सांग,

'हा दोष माझा होता का तुझा होता?

तात्पर्य : स्वतःच स्वतःच्या आयुष्याबद्दल जागृक राहिल्यास दैवास दोष देण्याची वेळ येत नाही.

## रहमते दर्शन (भाग - १)



२६ साल तक मैं महाराज कृपालसिंह जी की सेवा में रही । अंततः २१ अगस्त, १९७४ को महाराज जी का महाप्रयाण हुआ। मैं रोती बिलखती इधर-उधर घूमती रहती थी कि अब मैं कहा जाऊँ? मेरा दिल करता था कि या तो कुछ खा कर मर जाऊँ या दिल्ली ही छोड़ जाऊँ।

एक दिन संत कृपालसिंह जी ने मेरे दरवाज़े के बीच में मुझे दर्शन दिये और कहने लगे, तू दिल्ली छोड़कर कैसे जायेगी, हम तो यहीं रहेंगे। यह दृश्य मुझे कई बार दिखाई दिया।

एक दिन मुझे पता लगा कि महाराज संत दर्शनसिंह जी महाराज कृपालसिंह जी के उत्तराधिकारी हैं। मैं उनके निवास स्थान लक्ष्मी बाई नगर पहुँची। शाम के चार बजे का समय था। मैंने देखा महाराज जी कमरे से बाहर आ रहे थे। मेरी आँखों से आँसू निकल आये।

मेरा जन्म पाकिस्तान में हुआ । बचपन से ही मेरी माता जी ने मुझसे धर्मग्रंथों का पाठ करा कर मुझ में पवित्र संस्कार डाल दिये थे। मैं कुछ बड़ी हुई तो मुझे बाबा सावनसिंह जी से नामदान मिल गया। कुछ दिन पश्चात पाकिस्तान भारत से

### प्रारंभिक दिनों की याद

अलग हो गया। हम ब्यास आ गये। ब्यास में हुजूर सत्संग करते थे। उनके चोला छोड़ने पर मैं बहुत दुःखी थी कि एक दिन उन्होंने मुझे दर्शन दिये और सावन आश्रम, दिल्ली का दृश्य दिखाया और मुझे संत कृपालसिंह जी महाराज के सुपुर्द कर दिया। २६ साल तक मैं महाराज कृपालसिंह जी की सेवा में रही । अंततः २१ अगस्त, १९७४ को महाराज जी का महाप्रयाण हुआ । मैं रोती बिलखती इधर-उधर घूमती रहती थी कि अब मैं कहा जाऊँ? मेरा दिल करता था कि या तो कुछ खा कर मर जाऊँ या दिल्ली ही छोड़ जाऊँ ।

एक दिन संत कृपालसिंह जी ने मेरे दरवाज़े के बीच में मुझे दर्शन दिये और कहने लगे, तू दिल्ली छोड़कर कैसे जायेगी, हम तो यहीं रहेंगे। यह दृश्य मुझे कई बार दिखाई दिया।

एक दिन मुझे पता लगा कि महाराज संत दर्शनसिंह जी महाराज कृपालसिंह जी के उत्तराधिकारी हैं। मैं उनके निवास स्थान लक्ष्मी बाई नगर पहुँची। शाम के चार बजे का समय था। मैंने देखा महाराज जी कमरे से बाहर आ रहे थे। मेरी आँखों से आँसू निकल आये।

महाराज जी ने मेरी चुन्नी से मेरे आँसू पोंछे और दूसरे हाथ से मेरे दोनों हाथ पकड़ लिए। मुझे 'दर्शन' में महाराज कृपालसिंह जी के दर्शन हो गये। उन्होंने काला कोट और सफेद सलवार पहन रखी थी। मेरे मन में पूर्ण विश्वास हो गया कि दर्शनसिंह जी महाराज कृपालसिंह जी के उत्तराधिकारी हैं। अब महाराज दर्शनसिंह जी के घर जाने का मेरा सिलसिला चालू हो गया। टेप से सत्संग भी होने लगे। कभी-कभी लोधी कालोनी में भी सत्संग होते थे। अभी कोई ठिकाना नहीं था । कुछ लोग विरोध भी कर रहे थे।

एक दिन कुछ भाई-बहनों ने बेअन्त सिंह जी के घर मीटिंग की और यह तय हुआ कि सत्संग अब तिलक नगर, दिल्ली में रविवार को हुआ करेगा। उस समय सत्संग करने के लिए हमारे पास टेपरिकॉर्ड भी नहीं था। एक सत्संगी वेदप्रकाश था, जिसके पास से टेपरिकॉर्ड माँग कर हम सत्संग करते थे। हमें पार्कों में सत्संग करने पड़ते थे। संगत आती थी, पर पुलिस का भय लगा रहता था। हमें बार-बार धमकियाँ भी मिलती रहती थीं और तरह-तरह से डराया धमकाया जाता था, सत्संग बंद करने के लिए। परन्तु सत्संग चलता रहा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

फूड थैरीपी - इस चक्र को बैलेंस करने के लिए लाल रंग के फल फ्रूट खाएं। जैसे अनार, चुकंदर, गाजर, लाल मूली, लाल टमाटर, बादाम या और कोई भी पदार्थ जिन का रंग लाल हो आदि। किसी रोग के कारण अगर डाक्टर ने मना कर रखा है तो वह पदार्थ नहीं खाना।

मूल आधार और अस्वस्थ्य - अगर आप बीमारियों से ग्रस्त रहते है। घुटनों में दर्द, पैरों में दर्द, गठिया, शरीर में सुजन, कोई भी दर्द भय, धन हानि, पैसा खर्च ज्यादा होना, मेहनत करके भी लाभ न मिलना, किसी भी काम में सफलता न मिलना। घर में क्लेश रहता है। मन में वासना के तूफान उठते हैं, मन में तनाव रहता है दुःख रहता है। भूतकाल की यादें परेशान करती हैं। आप को कोई भी प्यार नहीं करता है। आप के पास धन की कमी है। ये सब यह दर्शाता है कि आप का मूल आधार चक्र दूषित है।

इन समस्यों को ठीक करने के लिए अपने को भृकुटी में आत्मा समझ कर शिव बाबा या इष्ट को याद करें। इस से आज्ञा चक्र शक्तिशाली बनता है और यह आज्ञा चक्र मूल आधार चक्र को भी ठीक कर देता है।

जरा सा भी कामुक संकल्प आये तो समझो मूल आधार चक्र कमजोर हो गया है। अगर आप एक दिन में दस हजार शुद्ध संकल्प मन में रिपीट

### मूल आधार चक्र

करें तो मूल आधार चक्र शक्तिशाली रहेगा। आप २० पेज अव्यक्त मुरली या कोई और सकारात्मक चिंतन पर बुक पढ़ते रहें तो आप का मूल आधार चक्र संतुलित रहेगा।

आप को जो भी रोग है उसके बारे गहरा ज्ञान लें और इलाज कराने से मूल आधार चक्र ठीक हो जाता है।

जीभ और दांत - जीभ और दांतों का मूल आधार चक्र से गहरा सम्बन्ध है। अगर आप की जीभ नॉन वेज या तामसिक खाना खाने या बाजार की चीजे खाने को मिचलाती है। कोई भी चीज देखते ही खाने की तमना होती है। अगर जीभ पर नियंत्रण नहीं है तो समझो मूल आधार चक्र कमजोर है। हमेशा सात्विक चीजें खाया करें इस से मूल आधार चक्र शक्तिशाली बनेगा।

ऐसे ही अगर आप बिना चबाये जल्दी जल्दी खाना निगलते हैं तो इस का मतलब है आप का मूल आधार चक्र कमजोर है। एक एक भोजन की बुर्की या गराही को ३२ बार चबा चबा कर खाएं आप का मूल आधार चक्र ठीक होगा। दांतों का कोई रोग या दर्द होता है तुरंत खान पान बदलें और डॉक्टर से इलाज कराएँ। यह चक्र ठीक हो जायेगा।

कब्ज - अगर कब्ज रहती है या होने लगती है, अगर बहुत गैस बनती है। तो इस का कारण मूल आधार चक्र ठीक नहीं है। तुरंत कब्ज और गैस को ठीक करें। भोजन में बदलाव करें। डॉक्टर की मदद लें। त्रिफला चूर्ण हर रोज एक चमच लेते रहें। कब्ज खत्म हो जाएगी। कब्ज ठीक होते ही मूल आधार चक्र ठीक हो जायेगा। कब्ज का मूल कारण है।

कान - दाहिने कान का मूल आधार चक्र से सम्बन्ध है। अगर आप अश्लील बातें सुनेगें तो आप को कामुक विचार उठेंगे जिस से मूल आधार चक्र पर असर होगा। इसलिए सदा अच्छी बातें सुने । सात्विक लोगों से सम्बन्ध रखें। अच्छे गाने सुने। इस से मूल आधार चक्र ठीक रहेगा।

आँखें

आंखों का भी मूल आधार चक्र से सीधा सम्बन्ध है। अगर अश्लील चीजें, अश्लील नृत्य देखेंगे तो मन धीरे धीरे कमजोर हो जाएगा। जिससे मूल आधार चक्र दूषित हो जायेगा । इसलियें आँखों से अच्छी चीजें ही देखें। अगर अश्लीलता की तरफ आंखे भटकती हैं तो इस का मूल कारण है मूल आधार चक्र दूषित है। राजयोग का अभ्यास करें, भोजन दोष और संग दोष से बचें और २० पेज अव्यक्त मुरली या कोई साकारात्मक चिन्तन पर बुक पढें । आँखें नियंत्रण में आ जाएंगी।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदीय बालसंस्कार

त्यातून बाळाला प्रेमाच्या उबेची जाणीव होते व त्यामुळे बाळ आनंदी, प्रसन्न राहते. बाळाला पायांवर घेऊन अभ्यंग करावे. तेल लावण्यापूर्वी तेल कोमट करून घ्यावे. तेल प्रथमतः पायांच्या तळव्यांना लावावे. नंतर तळव्यांपासून मांडीपर्यंत व नंतर हाताच्या तळव्यापासून दंडापर्यंत खालून वरच्या दिशेने तेल लावावे. नंतर सांध्याच्या ठिकाणी गोलाकार दिशेने लावावे. बाळाला पालथे टाकून पाठीला खालून वरच्या दिशेने तेल लावावे. सर्वात शेवटी छातीला व पोटाला मसाज करावा. पोटाला घड्याळाच्या दिशेप्रमाणे गोलाकार पद्धतीने हलक्या हाताने तेल चोळावे. अशा पद्धतीने तेल लावल्याने शरीरातील प्रकुपित झालेले दोष गॅसवाटे बाहेर पडण्यास मदत होते. बाळाच्या डोक्याला, टाळूला तेल जिरेल या पद्धतीने लावावे. रोज सकाळी अंघोळीच्या आधी किमान अर्धा तास अगोदर तेल लावावे. तेल लावल्यानंतर खिडकीतून किंवा दारातून कोवळा सूर्यप्रकाश येईल अशा ठिकाणी बाळाला खेळण्यासाठी थोडा वेळ दुपट्यावर ठेवावे. नंतर मोगरा, गुलाब, मंजिष्ठा, अगरू, नागरमोथा, चंदन, मसूरडाळ यांनी बनविलेले 'दुर्वांकुर बेबी उटणे' सर्व शरीराला लावावे. यामुळे बाळाच्या त्वचेवरची अनावश्यक लव नाहीशी होते. त्यानंतर बाळाला

### नवजात बाळाची काळजी कशी घ्यावी?

फार गरम व फार थंडही नाही अशा पाण्याने अंघोळ घालावी. अशा पद्धतीने अभ्यंग केल्यास बाळाचे स्नायू व हाडे लवचीक व मजबूत होतात. त्वचा कांतियुक्त होते. बाळाची प्रतिकारशक्ती वाढते व बाळाला शांत झोप लागते. पहिली दोन वर्षे बाळाला नियमित अभ्यंग करावे व नंतर पाच वर्षांपर्यंत आठवड्यातून एकदा, सुट्टीच्या दिवशी अभ्यंग करून स्नान घालावे. अभ्यंग करताना फार जोर लावून मसाज करू नये किंवा कोठलाही सांधा निखळणार नाही अशा हळुवार पद्धतीने अभ्यंग करावे. बाळाचे अवयव, त्वचा अतिशय नाजूक असते, त्यामुळे हळुवार व प्रेमाने बाळाला अभ्यंग करावे.

**आंघोळ** : आंघोळीचे पाणी फार गरम अथवा गार असू नये. बाळाला सोसवेल अशा कोमट पाण्याने बाळाला अंघोळ घालावी. चंदन, गुलाब, अनंतमूळ, हळद व मसूरडाळ यांचे वस्त्रगाळ चूर्ण 'दुधाच्या सायीमध्ये भिजवावे व याचे मिश्रण बाळाला लावावे. हे उटणे लावताना अभ्यगासारखेच 'खालून वर अशी दिशा ठेवावी. असे उटणे लावून अंघोळ घातल्यास बाळाची त्वचा कांतियुक्त सतेज होते व त्यावरील लवदेखील नाहीशी होते. यासाठीच आपण 'दुर्वांकुर बेबीवांश उटण लवले आहे. त्याचा वापर दुधाच्या सायीमधून करावा. साबण लावून अंघोळ घातल्यास बाळाची त्वचा रुक्ष, कोरडी पडते, म्हणून साबणाऐवजी उटण्याचा वापर करावा. आंघोळ घातल्यावर मऊ, सुती वस्त्राने बाळाचे अंग हलक्या हाताने कोरडे करुन पुसून घ्यावे.

**धूप (धुरी) :**

आगंतुज व्याधीपासून बालकाचे संरक्षण करण्यासाठी आयुर्वेदातील धूपन कल्पनेला फारच महत्त्व आहे.

बालकाचा बिछाना, पांघरूण म्हणून घेणारे वस्त्र, अंगावर घालण्याचे वस्त्र या सर्वांना अतसी, हिंग, गुग्गुळ, वचा, ब्राह्मी, शेतदुर्वा, जटामांसी, साधारण गुग्गुळ, अशोक, कुटकी इत्यादी द्रव्ये तुपामध्ये मिसळून त्याचे धूपन करावे. अशा धूपन क्रियेने रोग निर्माण करणारे जिवाणू नष्ट होतात व बाळाचे आगंतुज व्याधीपासून संरक्षण होते. अंघोळीनंतर रोज बाळाला धुरी द्यावी, त्यामुळे बाळाला सरदी, खोकला, ताप असे आजार वारंवार होत नाहीत.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडूळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# प्रशिक्षण व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणावर भर आवश्यक

### जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची सूचना

नगर – प्रशिक्षण व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करणे आवश्यक असुन त्या दृष्टीने प्रयत्न करावेत, अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केली.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली, त्यावेळी डॉ.आशिया यांनी ही सूचना केली.



जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली त्यावेळी सूचना देताना डॉ. पंकज आशिया.

या बैठकीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त निशांत सूर्यवंशी, कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक बालाजी बिराजदार, जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी बी.आर. मुंडे, एम.आय.डी. सी. चे क्षेत्र व्यवस्थापक, दिलीप काकडे, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त श्रीमती सावित्रा लबडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. शिवप्रसाद घालमे, महिला व बालकल्याण अधिकारी एन.बी.कराळे, शिक्षण विभाग (माध्यमिक) चे दत्तात्रय कवळे, उमेदचे सोमनाथ सातपुते, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे एस. व्ही. जाधव, माविमचे योगेश कदम, अहिल्यानगर महापालिकेच्या श्रीमती सुप्रिया घोगरे, जनशिक्षण संस्थानचे बाळासाहेब पवार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाचा आढावा घेऊन त्याप्रमाणे कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करावे. त्यासाठी उद्योगांचे प्रतिनिधी, एम.आय.डी.सी. चे अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी, कौशल्य व रोजगार विभागाचे अधिकारी यांची एकत्र बैठक घेण्यात यावी आणि याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यात यावा. अहिल्यानगर जिल्ह्यात हाती घेण्यात आलेल्या महिला सक्षमीकरणाच्या या विशेष अभियानाचा प्रारंभ येत्या महाराष्ट्र दिनापासून सुरुवात करण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व विभागांनी आवश्यकती तयारी करावी, अशी सूचना डॉ. आशिया यांनी केली.

प्रारंभी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी मागील बैठकीतील इतिवृत्ताची माहिती देऊन त्याबाबतच्या कार्यवाहीच्या तपशील सादर केला. विनायक देशमुख यावेळी बोलताना म्हणाले अनेक उद्योग विविध प्रकारची कामे बाहेरुन आऊट सोर्सिंगद्वारे करून घेतात. त्यापैकी अनेक कामे महिलांना करता येण्यासारखी आहेत. अशा प्रकारच्या कामांची माहिती एकत्रित करून व त्यादृष्टीने महिलांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देणे शक्य होईल.

# सब-ज्युनियर (मुले व मुली) आणि वरिष्ठ महिला जिल्हा फुटबॉल संघ निवड चाचणीचे आयोजन

### जिल्ह्यातील खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन

नगर – वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सब-ज्युनियर (१३ वर्षांखालील मुले व मुली) तसेच वरिष्ठ महिला (खुला गट) राज्य अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघ निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या पुढाकाराने राबविण्यात येणार असून, जिल्ह्यातील सर्व पात्र आणि उत्सुक खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस यांनी केले आहे.



निवड चाचणी व प्रशिक्षण शिबीर २१ एप्रिलपासून अहमदनगर कॉलेजच्या फुटबॉल मैदानावर दररोज संध्याकाळी ४:३० ते ६:३० या वेळेत घेण्यात येणार आहे. या निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी सर्व खेळाडूंना सीआरएस (सेंट्रल रजिस्ट्रेशन सिस्टम) नोंदणी अनिवार्य आहे. मात्र, जे खेळाडू यापूर्वी जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या १५ वर्षाखालील संघात किंवा फिरोदिया शिवाजीयन्स क्लबच्या स्टेट यूथ लीग संघात खेळले आहेत आणि वयोमर्यादेत बसतात, त्यांना पुन्हा नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. तसेच, जे खेळाडू ३१ मे २०२५ पर्यंत आधीपासून सीआरएस वर नोंदणीकृत आहेत, त्यांनाही पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही.

सीआरएस नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये मूळ आधार कार्ड, जन्मदाखला, पासपोर्ट साइज फोटो आणि पालकांचे संमतीपत्र यांचा समावेश आहे. ही कागदपत्रे स्कॅन करून पीडीएफ स्वरूपात adfa197273gmail.com या ई-मेल पत्त्यावर पाठवावी लागतील.

सब-ज्युनियर गटासाठी (मुले व मुली) १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१३ दरम्यान जन्मलेले खेळाडू पात्र ठरतील. निवड झालेले खेळाडू अहमदनगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना राज्य अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेत सहभागी होतील. या राज्यस्तरीय स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे खेळाडूंची महाराष्ट्र राज्य संघासाठी निवड होणार आहे. अधिक माहितीसाठी ७७०९०७०१६९ / ९६५७५३८८६८.



वृध्देश्वर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी नवोदय व मंथन परीक्षेत यश मिळविले.

# वृध्देश्वर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे नवोदय व मंथन परीक्षेत यश

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालयाने घेतलेल्या प्रवेश परीक्षेत व मंथन राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत चमकदार कामगिरी केली आहे.

विद्यालयातील कु.पवार निकिता नितीन या विद्यार्थिनीची जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. तसेच मंथन राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत इयत्ता पाचवीचा विद्यार्थी चि.शिरसाठ अथर्व ज्ञानेश्वर याने ३०० पैकी २८८ गुण मिळवून जिल्ह्यात प्रथम तर राज्यात सहावा क्रमांक पटकावला आहे. विद्यालयात या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत गौरव करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सेक्रेटरी ॲड.विश्वासराव आठरे, सहसेक्रेटरी जयंत वाघ, खजिनदार ॲड.दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे सदस्य डॉ. बाळकृष्ण मरकड, चंद्रकांत म्हस्के, अरविंद आठरे, काशिनाथ पा. लवांडे, सरपंच मुनिफा इलियास शेख, विद्यालयाचे प्राचार्य संजय म्हस्के, पर्यवेक्षक सुरेंद्र पेठकर, दादासाहेब मरकड व राजेंद्र गिते यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षक किरण दानवे, प्रेरणा कदम, विनायक शिंदे, शैलेश क्षेत्रे, प्रविण साठे यांचे मार्गदर्शन लाभले.

# उर्दू ही प्रेम वृद्धिंगत करणारी भाषा

### युनूस तांबटकर यांचे प्रतिपादन

नगर – उर्दू ही आपल्या मनाचं प्रतिबिंब व्यक्त करणारी भाषा आहे. मने जोडून प्रेम वृद्धिंगत करणारी ही भाषा सर्व भारतीयांचा मानबिंदू आहे. भाषेच्या प्रगतीसाठी सर्वांनी झटून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. विशेषता उर्दू भाषिक शिक्षण संस्था मधून उर्दू भाषा प्रगतीकडे जास्त लक्ष देण्याची गरज आहे. अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे कार्य प्रशंसनिय आहे. सलग १९ वर्षे उर्दू सप्ताह साजरा करणे सोपी गोष्ट नाही. जिल्हा उर्दू साहित्य परिषद सातत्याने भाषेच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन रहेमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर यांनी केले. अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित उर्दू सप्ताह समारंभात ते अध्यक्षीय भाषणात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी उर्दू साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष सलीमखान पठाण, उपाध्यक्ष के के खान, इमाम सय्यद, सचिव आबिद दूल्हेखान, सहसचिव डॉ.कमर सुरूर, सदस्या नर्गिस इनामदार, अनीस शेख, मुन्नवर हुसेन आदि उपस्थित होते.




अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या वतीने उर्दू सप्ताह आयोजित करण्यात आला होता.

तांबटकर पुढे म्हणाले की उर्दू भाषेने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. आज आपल्या देशात ही भाषा परकिय म्हणून गणली जात आहे ही दुर्दैवी बाब आहे. उर्दू माध्यमातून शिक्षणाच्या उच्च सुविधा उपलब्ध आहेत. त्याचा समाजातील विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक भाषणात उर्दू साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष सलीमखान पठाण यांनी उर्दू सप्ताह मागची भूमिका विशद केली. गेली १९ वर्षे देशांमध्ये उर्दू सप्ताह साजरा करणारा अहमदनगर हा एकमेव जिल्हा आहे असे सांगून या उर्दू सप्ताह मध्ये जिल्ह्यातील साडेचार हजार विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला,त्या सर्वांना प्रशस्तीपत्रे उर्दू साहित्य परिषदे मार्फत देण्यात आली आहेत. तसेच जिल्ह्यातील सप्ताहात सहभागी शिक्षक, मुख्याध्यापक यांना सन्मानचिन्ह देखील देण्यात आले आहे असे ते म्हणाले.

याप्रसंगी डॉ.कमर सुरूर, प्र. मुख्याध्यापक मुनव्वर हुसेन यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी उर्दू साहित्य परिषदे तर्फे जिल्ह्यातील सर्व शाळांना उर्दू भाषेतील बोर्ड प्रदान करण्यात आले. यासाठी उपाध्यक्ष के के खान यांचे सहकार्य मिळाले. सूत्रसंचालन सय्यद इमाम व फैयाज शेख यांनी केले. आभार आबिद खान यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी बदर शेख आणि शेख साजिद कुरेशी, जुनेद, हनीफ शेख, नर्गीस इनामदार, समीना शेख, शाकीर शेख, सलीम शेख आदींनी परिश्रम घेतले. याप्रसंगी शिक्षकांना सन्मानचिन्हे, विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र तसेच शाळांना बोर्ड वाटप करण्यात आले.

# उर्दू भारतीय भाषा... कोणत्याही धर्माशी तिचा संबंध नाही : सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली – उर्दू ही लोकभाषा आहे. ती कोणत्याही धर्माशी जोडलेली नाही आणि मराठीबरोबर तिच्या वापरावर कोणताही कायदेशीर प्रतिबंध नाही, असे सांगत अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपालिकेला उर्दूत फलक लावण्यास विरोध करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावली. भाषिक विविधतेचा आदर राखणे महत्त्वाचे असून, उर्दूसह इतर भाषांशी मैत्री करूया,असे मत न्यायालयाने यावेळी नोंदवले.

अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपालिकेच्या इमारतीवर लावण्यात आलेल्या फलकावर मराठीसह उर्दूचा वापर करण्यात आला आहे. पातूर नगरपालिकेच्या माजी नगरसेविका वर्षा संजय बागडे यांनी याला विरोध करत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने हा फलक वापरण्यास परवानगी दिल्यानंतर त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मात्र न्यायमूर्ती सुधांशु धुलिया आणि न्यायमूर्ती विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने कायद्यात उर्दूला बंदी नसल्याचे स्पष्ट केले. मराठीसह इतर भाषेचा वापर फलकात करणे हा महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण (अधिकृत भाषा) कायद्याचा भंग नाही, असेही न्यायालयाने सांगितले.




### न्यायालय काय म्हणाले?

पातूर नगरपालिकेच्या इमारतीवर उर्दू भाषेत फलक लावण्यास माजी नगरसेविकेने विरोध केला. अमरावतीच्या आयुक्तांनी अर्ज बाद केल्यावर मुंबई उच्च न्यायालयात याचिका फेटाळली. त्यावर नगरसेविकेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

उर्दूचा वापर हा केवळ संवाद अधिक मजबूत करण्यासाठी असून भाषेच्या विविधतेचा आदर राखायलाच हवा. भाषा ही नागरिकांमध्ये फूट पाडण्यास कारणीभूत ठरताच कामा नये.

स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम जनतेला दैनंदिन सेवा देण्याचे असते. फलकावर राज्याच्या अधिकृत मराठी भाषेव्यतिरिक्त उर्दूचा वापर केला जात असेल, तसेच पालिकेच्या हद्दीतील नागरिकांना जर उर्दू समजत असेल तर आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही.

उर्दू ही काही बाहेरील भाषा नाही. मराठी प्रमाणेच इंडो-आर्यन गटातील भाषा आहे. याच भूमीत तिचा जन्म झाला. येथेच उर्दू विकसित झाली.

विविध नागरिकांच्या गरजेनुसार वेगवेगळे सांस्कृतिक बंध असलेल्या लोकांची ही संवाद भाषा आहे. आजही देशातील सामान्य नागरिक जी भाषा बोलतात, त्यात अनेक उर्दू शब्द आहेत.

भाषा म्हणजे धर्म नाही.अगदी एखाद्या धर्माचेही प्रतिनिधित्व करत नाही. भाषा ही एका समुदायाची, प्रदेशाची, लोकांची असते; धर्माची नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.





अहमदनगर उर्दू हायस्कूलमध्ये जनरल नॉलेज परीक्षेच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

# अहमदनगर उर्दू हायस्कूलमध्ये जनरल नॉलेज परीक्षेच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

नगर – भाषा कोणतीही असो, ती ज्ञानाच्या प्रकाशाची वाहक असते. उर्दू भाषेच्या सौंदर्यातून झळकलेले हे ज्ञान, अहमदनगर उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपल्या मेहनतीने सिद्ध केले. नॅशनल एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी यांच्यावतीने आयोजित ऑल इंडिया जनरल नॉलेज परीक्षा ही केवळ एक स्पर्धा नव्हती, तर विद्यार्थ्यांच्या प्रतिभेची कसोटी होती – ज्यामध्ये शाळेने १००% निकालासह एक आदर्श उभारला.

सय्यद इनाया फिरोज हिने ८४ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा अभिमान वाढवला. रंगरेज मोहम्मद हुसैन अन्वर मोहम्मद आणि शेख सफुरा समीर यांनी ७६ गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला. शेख फातिमा समीर तृतीय स्थानावर (७४ गुण), तर खान आयशा इम्रान आणि शेख अब्दुलहसीब समीर यांनी ७२ गुणांसह चौथा क्रमांक मिळवला.

प्रमाणपत्र वितरणाचा समारंभ एक संस्मरणीय सोहळा ठरला. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित कैलास चौहान साहेब यांनी आपल्या भाषणात उर्दू भाषेवरील प्रेम व्यक्त केले. त्यांनी सांगितले, मी हिंदू धर्मीय असूनही माझ्या पालकांनी मला उर्दू माध्यमातून शिक्षण दिले. उर्दू ही केवळ एका समाजाची नाही, तर आपल्या भारत देशाच्या अनेकतेतील एकतेचं प्रतीक आहे. आजही मी उर्दू पुस्तके आणि वर्तमानपत्रं वाचतो – कारण ही माझी मातृभाषा आहे.

खान मुनव्वर हुसैन सर यांनी कार्यक्रमाच्या उद्देशावर प्रकाश टाकला, तर मौलवी वसीम सर यांनी उपस्थित पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख मुसैब सर यांनी प्रभावीपणे केले.

हा संपूर्ण कार्यक्रम हा विद्यार्थ्यांच्या यशाचा, शिक्षकांच्या समर्पणाचा आणि उर्दू भाषेच्या गौरवाचा एक सुंदर संगम ठरला. शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# भगवान परशुराम परिक्रमेस राज्यभरातून प्रतिसाद

नगर – श्री चिरंजीव प्रतिष्ठान, अहिल्यानगर आयोजित भगवान परशुराम जन्मोत्सव अंतर्गत भगवान परशुराम दर्शन परिक्रमा २०२५ अहिल्यानगर ते भगवान परशुराम जन्मस्थळ जानापावकुटी मध्यप्रदेश (माहूर, अकोला, ओंकारेश्वर मार्गे व कोपरगाव, मालेगाव मार्गे)१० ते १३ एप्रिल दरम्यान पूर्ण झाली. महाराष्ट्र राज्य व मध्यप्रदेश राज्यातील परिक्रमा मार्गातील सर्व शहरातील ब्रह्मवृंदांनि परिक्रामेचे हर्शोल्हासात व निस्सिम भक्तिभावाने स्वागत केले. यामध्ये शिवराम प्रतिष्ठान, संभाजीनगर, ब्राह्मण महिला मंच संभाजीनगर, जालना शहर भगवान परशुराम जन्मोत्सव समिती व ब्रह्मवृंद, श्रीक्षेत्र औंढा नागनाथ संस्थान व ब्रह्मवृंद, श्री रेणुकामाता संस्थान माहूर, श्री नृसिंहसरस्वती संस्थान, लाड कारंजा, अकोला शहर भगवान परशुराम जन्मोत्सव समिती, अकोला, महाराष्ट्र ब्राह्मण संघ खामगाव, ब्राह्मण महिला मंडळ खामगाव, युवक ब्राह्मण संघ खामगाव, बहुभाषिक ब्राह्मण संघ खामगाव, भगवान परशुराम जन्मोत्सव समिती व ब्रह्मावृंद नांदुरा, ब्राह्मण संघ, मलकापूर, ब्राह्मण संघ मुक्ताईनगर, ब्रह्मवृंद बऱ्हाणपूर, ब्रह्मवृंद ओंकारेश्वर, भगवान परशुराम मंदिर संस्थान समिती, जानापाव (मध्य प्रदेश) तसेच ब्राह्मण संघ राहुरी, गुहा, ब्राह्मण संघ, बेलापूर, ब्राह्मण संघ, श्रीरामपूर, ब्राह्मण संघ, कोपरगाव, ब्रह्मवृंद येवला, ब्रह्मवृंद, मनमाड, ब्रह्मवृंद, मालेगाव, ब्राह्मण वृंद धुळे, ब्राह्मण वृंद, शिरपूर, ब्राह्मण वृंद, सेंधवा या सर्व संघांनी परिक्रमेचे स्वागत केले. या सर्व ब्राह्मण संघाबरोबर परशुराम सेवा संघ, पुरोहित संघ, ब्राह्मण संघ, बहुभाषिक ब्राह्मण संघ यांचेही सहकार्य लाभले आहे. परिक्रमेत सहभागी झालेल्या सर्व भक्तांची जेवण, राहणे इ. सर्व बाबींची व्यवस्था केली. मागील दहा वर्षाप्रमाणे चालू अकराव्या वर्षीही दोन्ही राज्यातून ब्राह्मण वृंदांकडून परिक्रमेस मिळालेल्या प्रतिसाद मिळाला. परिक्रमेच्या यशस्वितेसाठी श्री चिरंजीव प्रतिष्ठान, अहिल्यानगरचे अध्यक्ष स्वप्निल देशमुख यांच्या मार्गदर्शनखाली सर्व परिक्रमा नियोजन समिती सदस्यांनी परिश्रम घेतले.

२९ एप्रिल रोजी श्री विठ्ठल मंदिर, पंचवटीनगर, भिस्तबाग चौक, सावेडी, अहिल्यानगर येथे स. ७ ते १२ या वेळेत भगवान परशुराम यज्ञाचे व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी उपस्थित राहून त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन स्वप्निल देशमुख यांनी केले आहे.

# मढी येथे धार्मिक एकात्मतेचा संदेश देत डॉ. आंबेडकर जयंती साजरी; सर्वधर्मीयांच्या उपस्थितीत मिरवणुकीत एकतेचे दर्शन

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मढी (ता. पाथर्डी) येथे उत्साहात व धार्मिक एकात्मतेचा संदेश देत साजरी करण्यात आली. विविध धर्मीय समाजबांधवांनी भगवे, निळे व हिरवे ध्वज हातात घेऊन मिरवणुकीत सामील होत समाजात ऐक्याचा अनोखा संदेश दिला. गावातून काढण्यात आलेली मिरवणूक लक्षवेधी ठरली.

पाथर्डी तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास शिवसेना दलित आघाडीचे अध्यक्ष अंबादास आरोळे, ज्येष्ठ नेते नवनाथ चव्हाण, तालुका प्रमुख भगवान दराडे, नंदूभाऊ डाळिंबकर, अशोक पगारे, भाऊसाहेब आरोळे, फिरोज शेख, फारुक शेख, काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत ससाणे, तसेच सतीश साळवे, आकाश शिंदे, सद्दाम शेख, अंतोन ससाणे, जॉन शिंदे आदी उपस्थित होते.

गावातून निघालेली मिरवणूक ही गावकरी, महिला, युवक-युवती यांच्या सहभागामुळे विशेष आकर्षण ठरली. शांततेत पार पडलेल्या मिरवणुकीमध्ये काँग्रेसचे पाथर्डी तालुका अध्यक्ष नसीम शेख, भोरु म्हस्के, बाळासाहेब शिंदे, अजित शिंदे, रवी ससाणे, विलास नरोटे, तोहकीक शेख, रोहित पुंड, संदेश शिंदे, आस्तान चव्हाण, शैला चव्हाण, सारिका चव्हाण, सीमा चव्हाण, वाळबाई काळे सहभागी झाले होते.

मिरवणुकीतून मढी गावातील नागरिकांनी सामाजिक सलोखा, बंधुतेचे दर्शन घडविले.



पाथर्डी तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# आस्थेने, श्रद्धेने, निस्वार्थ भावनेने दिली जाणारी आरोग्य सेवा कौतुकास्पद

**प्रफुल्ल चोरडिया यांचे प्रतिपादन; आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग तपासणी शिबिरास प्रतिसाद**

नगर – आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात रुग्णसेवेचे कार्य होत आहे. हॉस्पिटलच्या शिबिराच्या माध्यमातून चोरडिया परिवाराला रुग्णसेवा करण्याची संधी मिळाली आहे. रुग्णांना शिबिराच्या माध्यमातून अल्पदरात व मोफत सेवा आनंदऋषीजी हॉस्पिटलने उपलब्ध करून दिली आहे. यामुळे हजारो रुग्णांना या सेवेचा लाभ मिळत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आस्थेने, श्रद्धेने, निस्वार्थ भावनेने दिली जाणारी आरोग्य सेवा कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन उद्योजक प्रफुल्ल चोरडिया यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये पारस, प्रशांत, प्रफुल्ल चोरडिया परिवाराच्यावतीने मोफत स्त्रीरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरप्रसंगी सौ.कल्पना चोरडिया, सौ.जयश्री चोरडिया, सौ.स्मिता चोरडिया, आकांशा चोरडिया, सनी चोरडिया, तेजस चोरडीया, प्रतीक चोरडीया, साहिल चोरडिया, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधा कांकरिया, सतीश लोढा, मानकचंद कटारिया, डॉ.वसंत कटारीया, डॉ.आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.सोनल बोरुडे, डॉ.हिरल चौधरी (गुजराथी)आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, स्व.सुमतीलाल चोरडिया, स्व.सौ.कमलाबाई चोरडिया हे अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. त्यांनी केलेल्या संस्कारामुळे चोरडिया परिवार हा सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर आहे. चोरडिया परिवार हा आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात पूर्वीपासूनच जोडला गेलेला आहे. तसेच भगवान महावीर युनिव्हर्सिटी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पला ही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांचे स्वप्न साकारण्यासाठी समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत आरोग्यसेवेचे कार्य पोहोचविण्याच्या उद्देशाने हॉस्पिटलमध्ये वर्षभर विविध आरोग्य शिबिरे घेतली जातात. समाजातील चोरडिया परिवारासारख्या दानशूर व्यक्तींमुळे हे शक्य होत आहे.

डॉ.हिरल चौधरी म्हणाले, या शिबिराच्या माध्यमातून स्त्रियांच्या मासिक पाळी संदर्भात येणाऱ्या विविध समस्या तसेच दुर्बिणीद्वारे कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी काढणे, गर्भवती महिलांची नऊ महिने तपासणी करणे, तसेच गर्भवती स्त्रियांच्या तपासणी केल्यानंतर शिशूंच्या जन्म जात समस्या असल्यास त्यांना योग्य मार्गदर्शन करणे तसेच विविध स्त्रीरोगाच्या तपासण्या केल्या जातात. या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा.

आकांशा चोरडिया म्हणाले, प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या पंचवीस वर्षापासून चोरडिया परिवार आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात जोडला गेलेला आहे. शिबिराच्या माध्यमातून चोरडीया परिवाराला सेवा करण्याची संधी दिली. त्यामुळे चोरडिया परिवार धन्य झाला आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलची कीर्ती सर्वदूर पसरली आहे. त्याचे श्रेय निस्वार्थ व सेवाभावी वृत्तीने कार्य करणारे हॉस्पिटलचा सर्व कर्मचारी, डॉक्टर्स, नर्सेस तसेच जैन सोशल फेडरेशनचे सर्व कार्यकर्ते यांना जाते. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवा कार्याचा लाभ सर्वांना मिळो व सर्वांचे जीवन आनंदी होवो हीच प्रार्थना आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या चरणी करते.

डॉ.आशिष भंडारी यांनी सुत्रसंचालन केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले. स्त्रीरोग तपासणी शिबिरात १०५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# दातरंगे मळ्यातील पर्जन्येश्वर महादेव मंदिरातर्फे १९ ते २६ एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह



नगर – दातरंगे मळा येथील पर्जन्येश्वर महादेव मंदिराच्या वतीने १९ ते २६ एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिराच्या वतीने देण्यात आली. या अखंड हरिनाम सप्ताहाचे हे २० वर्ष असून या निमित्त विविध महाराजांचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहमध्ये १९ एप्रिल रोजी दु.१ ते ४ वा. विश्वकर्मा भजनी मंडळ (शिंदे मिस्तरी) ठाणगे मळा, पर्जन्येश्वर महिला भजनी मंडळ, आदर्शनगर, गणेश महिला भजनी मंडळ, यांचे भजन, दु.४ ते ६ वा. ह.भ.प.अभंग महाराज पठाडे यांचा श्री भगवान शंकर पार्वती शिवमहापुराण कथा भाग – १, रा.९ ते ११ वा. बालकिर्तनकार – ह.भ.प.श्री. अथर्व महाराज गंभीरे श्री रामकृष्णहरी अध्या. वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची यांचे किर्तन, २० एप्रिल रोजी बाळाजी बुवा भजनी मंडळ / पर्जन्येश्वर महिला भजनी मंडळ यांचे भजन, श्री भगवान शंकर पार्वती शिवमहापुराण कथा भाग – २, ह.भ.प. कपिल महाराज माळवदे अहिल्यानगर यांचे किर्तन, २१ एप्रिल रोजी राधाकृष्ण भजनी मंडळ, दातरंगे मळा / वारुळाचा मारुती भजनी मंडळ यांचे भजन, श्री स्वामी समर्थ महाराज जीवन चरित्र कथा भाग – १, ह.भ.प. बाळकृष्ण महाराज खेसे, विनोदाचार्य यांचे किर्तन, २२ एप्रिल रोजी विठ्ठल भजनी मंडळ, पाईपलाईन रोड यांचे भजन, श्री. स्वामी समर्थ महाराज जीवन चरित्र कथा भाग – २, ह.भ.प. संजय महाराज हिवराळे आळंदी देवाची, यांचे किर्तन, २३ एप्रिल रोजी पर्जन्येश्वर महिला भजनी मंडळ हरि ओम महिला भजनी मंडळ, तांगे गल्ली यांचे भजन, श्री संत कबीर महाराज जीवन चरित्र कथा भाग – १, ह.भ.प. सचिन महाराज पवार श्री संत शिरोमणी सेना महाराज मंदिर, नेवासा यांचे किर्तन, २४ एप्रिल रोजी कपिलेश्वर महिला भजनी मंडळ, माळीवाडा. बाळाजी बुवा भजनी मंडळ यांचे भजन, श्री संत कबीर महाराज जीवन चरित्र कथा भाग – २, ह.भ.प. मुकुंद महाराज विधाते छत्रपती संभाजीनगर यांचे किर्तन, २५ एप्रिल रोजी हडको हरिहरेश्वर महिला भजनी मंडळ राधाकृष्ण महिला भजनी मंडळ यांचे भजन, दु. ४ ते ६ वा दिंडी प्रदक्षिणा, प्रेममुर्ती ह.भ.प. अशोक महाराज ईलग (शास्त्री) बोधेगांव यांचे किर्तन होणार आहे.

दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ८ श्री स्वामी समर्थ पाठ, सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १ ते २ शिवलिलामृत, दुपारी ५ ते ६ माऊली चरित्र,सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन होणार आहे.

सप्ताहात व्यासपीठ चालक – ह.भ.प. सारंग महाराज कदम, आळंदी गायनाचार्य – ह.भ.प. अनिरुध्द महाराज शिंदे, कपिल म. माळवदे, सचिन म. पवार, रवी म. आल्हाट, रवी महाराज आव्हाड,मृद्माचार्य – ह.भ.प. गुरुवर्य एकनाथजी महाराज कोष्टी, अभंग महाराज पठाडे, सारंग महाराज कदम, आनंद महाराज दातरंगे, चोपदार –सोमनाथ इंगोले, साऊंड सिस्टीम वीणा पहारेकरी – रुपचंद म. शिंगरे, तुळशीराम महाराज वाघ, विष्णुगिरी महाराज गोसावी, टाळकरी मंडळ – करण म. जंजिरे, चैतन्य म. जाधव, समाधान प. मेरढ, भावेश म. जोंधळे, जयकार म. थोरात, ज्ञानराज म. मगर कौडगांव यांची साथ मिळणार आहे. २६ एप्रिल रोजी रा.९ ते ११ ह.भ.प. श्री श्रीनिवास महाराज घुगे, आळंदी देवाची. काल्याचे किर्तन व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल.

# डॉ. अमोल बागुल यांचा रोड टू कोड उपक्रम शिक्षक, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त : टिम कुर्टीस

**युनेस्कोच्या तिसऱ्या ए आय परिषदेत डॉ. बागूल यांचा सन्मान**

नगर– आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाचा वेग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून काळाच्या शेकडो पट पुढे आहे. रोबोटिक्स, आयसीटी सॉफ्ट स्किल्स, ॲप–वेब डिझाईनिंग आणि कोडींग ही नव्या युगाची शस्त्रे आहेत. वर्तमान काळात जवळजवळ सर्वांनाच याची प्राथमिक का होईना माहिती असणे प्रचंड गरजेचे झालेले आहे. डॉ बागुल यांचा या गोष्टींबद्दल प्राथमिक माहिती देणारा रोड टू कोड हा उपक्रम शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांसाठी खरोखरच उपयुक्त आहे, असे प्रतिपादन युनोस्को–आशियाचे प्रादेशिक संचालक टीम कुर्टीस यांनी केले.

हैदराबाद येथील भारतातील पहिले प्रोटोटाइप सेंटर असलेल्या टी वर्क येथे झालेल्या युनेस्को, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार तसेच डिजिटल इंडियाच्या इंडिया एआय मिशन तसेच उदयोन्मुख तंत्रज्ञान, आयटीईएससी विभाग, तेलंगाना सरकारच्या वतीने आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित तिसऱ्या ए आय रॅम परिषदेत शिक्षक डॉ.अमोल बागुल यांच्या रोड टू कोड या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपक्रमाच्या वेबपेज विमोचनप्रसंगी श्री. कुर्टीस बोलत होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अभिषेक सिंग (अतिरिक्त सचिव, Meit आणि CEO, IndiaAI मिशन), जेम्स राईट (युनेस्को–कार्यक्रम विशेषज्ञ), श्रद्धा शर्मा (संस्थापक आणि सीईओ, युअरस्टोरी मेडीया), कविता भाटिया (सीओओ, इंडिया AI मिशन आणि ग्रुप कोऑर्डिनेटर, इमर्जिंग टेक्नॉलॉजीज डिव्हिजन, एमईआयटीवाय), डॉ.कृष्णाश्री अच्युतन (पीजी प्रोग्राम्सचे डीन, अमृता विश्व विद्यापीठाचे स्कूल ऑफ इंजिनियरिंग), रमादेवी लंका (संचालक, इमर्जिंग टेक्नॉलॉजीज, तेलंगणा सरकार), डॉ. प्रीती बंजल (सल्लागार/भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार शास्त्रज्ञ) आदी उपस्थित होते. ए आय विषयक साहित्याची किट प्रदान करून डॉ.बागुल यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कोडींगचा उपयोग करून वेबसाईट–ॲप–गेम्स निर्मिती, माहिती विश्लेषण तसेच तंत्रज्ञानाच्या विविध गोष्टींसाठी केला जातो. डॉ.बागुल यांच्या बागुल वेबसाईटच्या 'माय–एआय' या नाविन्यपूर्ण स्टार्टअप संकल्पनेतील रोड टू कोड या उपक्रमात जगभरातील कोडींगविषयक कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्ती, तज्ञ, उपक्रम, प्रणाली यांचा डाटाबेस, वापरकर्त्यांच्या गरजेनुसार उपलब्ध होणाऱ्या कोडींगच्या विविध सुविधा, विद्यार्थी, शिक्षक व पालकांसाठी अध्ययन अध्यापनाच्या वैशिष्ट्यपूर्ण कोडींग पद्धती, दैनंदिन जागतिक कोडींग घडामोडी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.




युनेस्कोच्या तिसऱ्या ए आय परिषदेत डॉ. अमोल बागूल यांचा सन्मान करण्यात आला.



अहमदनगर पहिली मंडळी (सी.एन.आय.) चर्च मध्ये गुड फ्रायडे निमित्त प्रार्थना व उपासना करण्यात आली. यावेळी उत्तम शुक्रवारचा संदेश रेव्ह.अभिषेक पारकर यांना दिला. (छाया – यतीन कांबळे)

## गुड फ्रायडे निमित्त सी.एन.आय. चर्चमध्ये प्रार्थना व उपासना

नगर – गुड फ्रायडे या पवित्र दिवशी, येशू ख्रिस्ताचे सखोल बलिदान तुम्हाला जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये प्रेम, करुणा आणि क्षमा स्वीकारण्यास प्रेरित करो. गुड फ्रायडे सर्वांना आठवण करून देतो की, अंधाराच्या क्षणांमध्येही आशा आणि मुक्ती सहज उपलब्ध असते. तुमचे हृदय शांती आणि कृतज्ञतेने भरून जावो. आपल्या तारणहाराच्या वधस्तंभावरील मृत्युचे स्मरण करताना, आपण त्याला वधस्तंभावर नेणार्या अमर्याद प्रेमावर चिंतन करूया आणि आपल्या दैनंदिन जीवनात त्या प्रेमाचे प्रतिबिंब पाडण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

अहमदनगर पहिली मंडळी (सी.एन.आय.) चर्च मध्ये गुड फ्रायडे निमित्त प्रार्थना व उपासना करण्यात आली. यावेळी उत्तम शुक्रवारचा संदेश प्रिस्ट इनचार्ज, चर्च ऑफ होली एंजल्स पुणे येथील रेव्ह.अभिषेक पारकर यांना दिला.

उत्तम शुक्रवार ह्या दिवशी अखिल मानवाच्या कल्याणाकरिता येशू ख्रिस्ताने जे सात शब्द वध स्तंभावरून उच्चारले त्यावर प्रवचन करण्याकरिता पुणे या ठिकाणाहून रेव्ह अभिषेक पारकर यांना पाचरण करण्यात आले होते. सूत्रसंचालन रेव्ह. राजकुमारी सिंग यांनी केले. भक्तगणाला प्रभू येशूने जे शब्द वधस्तंभा वर उच्चारीले त्यावर उपदेश केला.

यावेळी समाज बांधव चर्चमध्ये उपस्थित होते. तसेच चर्चचे सर्व विश्वस्त उपस्थित होते.

# गुड फ्रायडे निमित्त ह्युम मेमोरियल चर्चमध्ये उपासना



अहमदनगर पहिली मंडळी (कॉंग्रिगेशनल) अहमदनगर, ह्युम मेमोरियल चर्च, न्यू चर्च रोड, अहमदनगर चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली.

नगर – गुड फ्रायडे निमित्त देशभरात ख्रिस्ती धर्मीयांनी श्रद्धेने आणि भक्तिभावाने प्रार्थना करून येशू ख्रिस्ताच्या बलिदानाची आठवण केली. हा दिवस ख्रिस्ती धर्मात अत्यंत पवित्र मानला जातो, कारण येशू ख्रिस्त यांचं क्रूसावर बलिदान याच दिवशी झाले होते.

अहमदनगर पहिली मंडळी (कॉंग्रिगेशनल) अहमदनगर, ह्युम मेमोरियल चर्च, न्यू चर्च रोड, अहमदनगर चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली. लोकांनी उपासना करत आणि शांततेत वेळ घालवत आपल्या श्रद्धेची प्रचिती दिली. यावेळी पा.मनोज तेलोरे व रेव्ह.डॉ.सनी मिसाळ यांचे मार्गदर्शनपर मनोगते झाली.

यावेळी पा.मनोज तेलोरे यांनी संदेशपर मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले गुड फ्रायडे हा दुःखाचा दिवस मानला जातो आणि त्यामुळे कोणतेही उत्सव किंवा आनंदाचे कार्यक्रम टाळले जातात. अनेकांनी येशूच्या शिकवणींचा आणि त्यागाचा आदर करत समाजासाठी सेवा कार्यही केले. प्रभु येशू ख्रिस्तांनी जे सात उद्गार काढले. हे बापा, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करतात, हे त्याना समजत नाही., तू आज मजबरोबर सुखलोकांत असशील., बाई, पहा हा तुझा पुत्र पाहा ही, तुझी आई., एलोई, इलोई, लमा सबकतानी? म्हणजे माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केल?, मला तहान लागली आहे., पूर्ण झाले आहे., मी आपला आत्मा तुझ्या हाती सोपवून देतो. या सात उद्गारावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी रेव्ह.डॉ.सनी मिसाळ म्हणाले की, 'गुड फ्रायडे' या नावात गुड (चांगला) हा शब्द असला तरी हा दिवस दुःखाचा असतो, कारण येशूंचा त्याच दिवशी मृत्यू झाला. मात्र, त्यांच्या मृत्यूनंतर तीन दिवसांनी, म्हणजे ईस्टर संडेला ते पुन्हा जिवंत झाले, हे ख्रिस्ती धर्मातील श्रद्धेचे महत्त्वाचे केंद्रबिंदू आहे.

यावेळी प्रास्तविकात सेक्रेटरी रविंद्र ठोंबरे म्हणाले की, पवित्र सप्ताहानिमित्त अहमदनगर पहिली मंडळी (कॉंग्रिगेशनल) अहमदनगर चर्चच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. यानिमित्त झावळ्याचा रविवार, उपासना, मौंदी गुरुवार, दृढीकरण व प्रभूभोजन विधी, उत्तम शुक्रवार, तरुण तरुणींना मार्गदर्शन, वॉच नाईट कार्यक्रम, प्रभात फेरी व सुर्योदयापूर्वीची उपासना, पुनरुत्थान दिन उपासना व बाप्तिस्मा विधी असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

यावेळी समाज बांधव उपस्थित होते. तसेच सर्व विश्वस्त मंडळही उपस्थित होते. यावेळी आभार खजिनदार विनोद भालेराव यांनी मानले.



# नागापूर येथे २० एप्रिलपासून अखंड नाम, जप, यज्ञ सप्ताह

नगर – नागापुरातील गजानन कॉलनी येथील श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बाल सु–संस्कार केंद्रात श्रीस्वामी समर्थ महाराज पुण्यतिथीनिमित्त २० ते २६ एप्रिल दरम्यान अखंड नाम, जप, यज्ञ, प्रहर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या यज्ञज्ञाग सेवेअंतर्गत सकाळी १०.३० ते दुपारी १२ या कालावधीत दररोज नित्य स्वाहाकाराबरोबरच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहापूर्वी उद्या (शनिवारी) ग्रामदेवता निमंत्रण व मंडल मांडणी होईल. २० एप्रिल – मंडल स्थापना, अग्निस्थापना, स्थापित देवता हवन होईल. २१ एप्रिल – गणेशयाग, मनोबोध याग. २२ एप्रिल – चंडी याग. २३ एप्रिल – स्वामी याग, २४ एप्रिल – श्री गिताई याग, २५ एप्रिल – रूद्रयाग, मल्हारी याग. २६ एप्रिल रोजी बली पूर्णाहुती, श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन होईल. याच दिवशी महानैवेद्य आरती मार्गदर्शन व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त होणार्या या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नागापूर येथील केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# देशाच्या विकासासाठी एकतेची गरज

**मुफ्ती सालीम यमनी चाऊस यांचे प्रतिपादन; इन्सानियत ईद मिलन कार्यक्रमातून ऐक्याचे व माणुसकीचे संदेश, खा. निलेश लंके यांनी घेतला शीरखुर्माचा आस्वाद**



इन्सानियत अभियान अंतर्गत खादीम ए मुफ्ती सालीम यमनी चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली इन्सानियत ईद मिलन कार्यक्रमाचे चाँद सुलताना हायस्कूल येथे आयोजन करण्यात आले होते.

नगर – आपल्या पूर्वजांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. त्यांनी हिंदू मुस्लिम वादासाठी नव्हे तर भावी पिढ्या प्रेम, न्याय व माणुसकीने एकत्र नांदाव्यात, यासाठी ते बलिदान दिले. दुर्दैवाने आज द्वेषयुक्त भाषण व चित्रपट अधिक पसंत केले जात आहे. जर आपल्याला देशाची अखंडता हवी असेल तर अशा विचारसरणीपासून दूर राहून प्रेम ऐक्य व माणुसकी जोपासायला हवी असल्याचे प्रतिपादन मुफ्ती सालीम यमनी चाऊस यांनी केले.

इन्सानियत अभियान अंतर्गत खादीम ए मुफ्ती सालीम यमनी चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली इन्सानियत ईद मिलन कार्यक्रमाचे चाँद सुलताना हायस्कूल येथे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील व जिल्ह्यातील सर्वधर्मीय समाजबांधवांनी सहभागी होत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी खासदार निलेश लंके, खादीम ए इन्सानियत अभियानचे मुफ्ती सालीम यमनी चाऊस, वसंत लोढा, जयंत वाघ, बाळासाहेब बोराटे, जंगम देवा, दत्ता कावरे, संजय झिंजे, मोहसीन शेख, कादिर सर, नलिनी गायकवाड, ॲड. अनिता दिघे, भन्ते धम्मपाल, भन्ते नागसेन, जितेंद्र वांग, बंटी शेख, मोहसीन चाऊस, जएद चाऊस, मुजम्मिल शेख, मतीन शेख, उमर शेख, अल्तमश जरीवाला, अज्जू शेख, बंटी भिंगारदिवे, मोसिन पठाण, परेश लोखंडे, नादीर शेख, अमजद शेख, मुस्ताक सर, ॲड. नदीम शेख, ॲड. अख्तर शेख, डॉ. मुदसर आदीसह विविध समाजाचे धर्मगुरू व प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यक्रमात अहमदनगर जिल्ह्यातील सर्व धर्माचे धर्मगुरू तसेच सर्व पक्षाचे नेते उपस्थित होते.

मुफ्ती सालीम यमनी चाऊस यांनी २०१० पासून देशभर राबवलेल्या इन्सानियत अभियान या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक करत देशासाठी एक अत्यंत आवश्यक व महत्त्वाची चळवळ म्हणून गौरवले तसेच 'इन्साफ लव्ह इन्सानियत, देशाला द्वेषाच्या आगीतून वाचवा' या पुस्तकाचे कौतुक केले व मुफ्ती सालीम यामनी चाऊस यांना पद्मश्री सन्मान मिळायलाच हवा, असे कौतुक करण्यात आले.

खासदार निलेश लंके म्हणाले की, मुफ्तींचे बोलणे ऐकताना असे वाटले की, त्यांच्या बोलण्यात एक वेदना, आत्मियता व माणुसकी आहे. लवकरच आम्ही त्यांच्यासोबत मिळून इन्सानियत अभियानाची राष्ट्रीय परिषद आयोजित करणार असून, यातून देशात ऐक्याचा व प्रेमाचा संदेश पोहोचेल, अशी भावना व्यक्त केली.

वसंत लोढा म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ सबका विकास या विचाराशी समरस होऊन देशात द्वेष व अन्याय संपवायचा असेल तर सर्वांना एकत्र घेऊनच पुढे जावे लागणार असल्याची भावना व्यक्त केली.

सर्व धर्मगुरू व पक्षाचे नेते यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप जय हिंद, जय इन्सानियत, जय इन्साफ या घोषणांनी झाला व उपस्थित सर्वांनी शीरखुर्माचा आस्वाद घेतला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## धूम्रपान आणि मनारोग्य



माणसाने अनेक विचित्र सवयी स्वतःला लावून घेतलेल्या आहेत. त्यामध्ये नाका-तोंडातून धूर काढणाऱ्या धूम्रपानाचा समावेश होतो. 'नाकाचा वापर धुराड्यासारखा व्हावा अशी देवाची इच्छा असती तर त्याने नाकपुड्या उफराट्या ठेवल्या नसत्या का?' असे महान कृषीशास्त्रज्ञ जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांनी म्हटले होते.

'धूम्रपान आरोग्यासाठी घातक असते', असे वाक्य सिगारेटच्या पाकिटावरही लिहिलेले असते; पण तरीही अनेक जण त्याकडे दुर्लक्ष करतात आणि सर्रास धूम्रपान करतात. धूम्रपानाचा परिणाम केवळ आपल्या शारीरिक आरोग्यावरच नाही, तर तो मानसिक आरोग्यावरही होत असतो. जर धूम्रपान करणार्याने धूम्रपानास तिलांजली दिली तर त्याचे मानसिक आरोग्य सुधारते, असे मत वॉशिंग्टन विद्यापीठातील एका संशोधकाने व्यक्त केलेले आहे.

हृदयविकाराचा झटका येऊन गेलेल्या रुग्णाने जर धूम्रपान सोडले, तर त्याचे फायदे त्याला लगेच मिळतात. त्याचे दैनंदिन जीवन सुधारते आणि त्याच्या मानसिक आरोग्यातही बर्यापैकी सुधारणा होतात.

धूम्रपान सोडल्यास महिनाभरात त्याचे मानसिक परिणाम तुम्हाला जाणवायला लागतात, असे वॉशिंग्टन विद्यापीठातील औषधोत्पादन विभागचे सहायक प्राध्यापक शेरॉन क्रेसी यांनी सांगितले. धूम्रपान सातत्याने करणार्याला हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका असतो. हृदयविकाराचा पहिला झटका येऊनही जो धूम्रपान सोडत नसेल तर त्याला दुसरा झटका येण्याची किंवा मृत्यू येण्याची भीती असते. पण, हृदयविकाराचा पहिला झटका आल्यानंतर धूम्रपान कायमचे सोडून दिले तर दुसरा झटका येण्याची शक्यता काही प्रमाणात कमी होते. रुग्णाच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. दैनंदिन जीवनात त्याला प्रसन्न वाटते आणि विचारशीलतेलाही चालना मिळते, असे क्रेसी सांगतात.

## मागे उडू शकणारा पक्षी

हा पक्षी आपल्या वजनाच्या दुप्पट खातो अन्न



हृ निसर्गाने आपल्याला अनेक अद्भुत आश्चर्ये दिली आहेत. त्यापैकी एक म्हणजे हमिंगबर्ड, जगातील एकमेव असा पक्षी जो मागे उडू शकतो. हमिंगबर्ड हा जगातील सर्वात लहान पक्षी आहे. त्याचं वजन फक्त २ ते २० ग्रॅम असतं. पण, त्याच्या आकाराइतकंच त्याचं कौशल्य देखील लक्षणीय आहे. हा पक्षी एका सेकंदात आपले पंख सुमारे ५० ते ८० वेळा फडफडवतो.

हमिंगबर्डची सर्वात आश्चर्यकारक क्षमता म्हणजे मागे उडणे या वेगवान पंखांच्या हालचालीमुळे त्याला '८' च्या आकारात उडता येते, तसंच तो हवेत एका जागी स्थिर राहू शकतो.पण, हमिंगबर्डची सर्वात आश्चर्यकारक क्षमता म्हणजे मागे उडणे. इतर कोणताही पक्षी हे करू शकत नाही. हमिंगबर्ड आपल्या पंखांना अशा प्रकारे वळवतो की तो सरळ मागे उडू शकतो. ही क्षमता त्याला फुलांमधून मध गोळा करताना अतिशय उपयोगी पडते. तो फुलाजवळ थांबतो, मध पितो आणि मग सरळ मागे जातो.

हमिंगबर्डची ही विशेष क्षमता त्याच्या अन्नसंकलनासाठी महत्त्वाची आहे. तो दररोज आपल्या वजनाच्या दुप्पट अन्न खातो. त्यासाठी तो दिवसभरात सुमारे १००० ते २००० फुलांना भेट देतो. त्याचे हृदय एका मिनिटात १२०० वेळा धडकते, जे मानवी हृदयाच्या धडकण्यापेक्षा २० पट जास्त आहे. हमिंगबर्डच्या या अद्भुत क्षमतेमुळे तो परागीभवनात महत्त्वाची भूमिका बजावतो. तो एका फुलावरून दुसऱ्या फुलावर जाताना परागकण वाहून नेतो, ज्यामुळे वनस्पतींचं प्रजनन होते. अशा प्रकारे, निसर्गाच्या संतुलनात हा छोटासा पक्षी मोठे योगदान देतो. हमिंगबर्ड आपल्याला शिकवतो की, आकार लहान असला तरी कौशल्य मोठे असू शकते. त्याची मागे उडण्याची क्षमता आपल्याला सांगते की, कधीकधी अपारंपरिक मार्ग स्वीकारणं, हेच यशाचे गमक असू शकते.

## मुंग्यांचं चमत्कारीक विश्व

**मुंग्या लहान असल्या, तरी त्यांचे जग आश्चर्यकारक असते आणि त्यांच्या क्षमतांनी आपण सगळे थक्क होऊन जावे, इतके ते अफाट शक्तिशाली असतात! काय आहेत त्यांची चकित करणारी रहस्ये, याचा हा लेखाजोखा...**



मुंग्याचे जबडे इतके शक्तिशाली आहेत की, ते आपल्या वजनाच्या ५० पटीने वजन उचलू शकतात. मुंग्या एकमेकांशी विशेष फेरोमोन नावाच्या रसायनाच्या माध्यमातून संवाद साधतात, ज्यामुळे त्यांना मार्ग शोधणे आणि इतरांशी माहिती शेअर करणे सोपे होते.

मुंग्यांच्या मेंदूची रचना त्यांच्या आकारमानाच्या तुलनेत अतिशय जटिल आहे. ते समस्या सोडवू शकतात, मार्ग ओळखू शकतात आणि अगदी खेळही खेळू शकतात. मुंग्यांचा समाज अतिशय सुव्यवस्थित असतो. त्यांच्यात राणी, डंख मारणारे मेल मुंग्या, आणि कामगारही असतात. प्रत्येक मुंगीची त्यांच्या समाजात विशिष्ट भूमिका असते.

काही राणी मुंग्या ३० वर्षांपर्यंत जिवंत राहू शकतात, ज्यामुळे त्यांना सर्वांत दीर्घायुषी कीटकांमध्ये गणतात. काही मुंग्या जमिनीखाली बुरशी वाढवून ते अन्न म्हणून वापरतात, जणू त्या स्वतः शेतकरीच असतात.

काही प्रजातींमध्ये गुलामगिरी पद्धत असते. त्या दुसऱ्या मुंग्यांच्या वसाहतींवर हल्ला करून त्यांच्या कामगारांना गुलाम बनवतात. मुंग्यांच्या शरीरात काही नैसर्गिक ॲन्टिबायोटिक्स असतात, ज्यामुळे त्यांना संसर्गांपासून संरक्षण मिळते.

मुंग्या एका सेकंदात जवळपास ४०० पट त्यांचे पाय हलवू शकतात, ज्यामुळे त्यांचा वेग प्रचंड असतो. मुंग्यांचा इतिहास जवळपास १० कोटी वर्षांपूर्वीचा आहे, म्हणजेच डायनासोर काळापासून त्या पृथ्वीवर आहेत.

## आता आवाजाने चार्जिंग



सेलफोनही आता दैनंदिन गरजेची वस्तू बनलेला आहे. मात्र, त्याचे चार्जिंग हा नेहमी डोकेदुखीचा विषय असतो. चार्जिंग संपले आणि चार्जर जवळ नसेल तर पंचाईत होते. सेलफोनचे चार्जिंग कशा प्रकारे करता येऊ शकते, याचे काही भन्नाट मार्गही शोधले जात असतात. ब्रिटनमध्येही याबाबतचे एक संशोधन झालेले आहे. त्यानुसार वाहतुकीचा, संगीताचा आवाज, फुटबॉल मैदानावरील गोंधळाचा आवाज अशा अनेक प्रकारच्या आवाजांमुळे मोबाईल चार्ज करता येईल.

लंडनच्या क्वीन मेरी विद्यापीठातील वैज्ञानिकांनी आवाजापासून ऊर्जा तयार करणारा नॅनो जनरेटर तयार केलेला आहे. त्याचा वापर सेलफोन चार्जिंगसाठी करता येईल. रोज आपण जे आवाज ऐकतो त्या सर्वप्रकारच्या ध्वनी ऊर्जेचा उपयोग करून विद्युत ऊर्जा तयार करता येईल. वैज्ञानिकांच्या पथकाने झिंक ऑक्साईडचे गुणधर्म बघितले असता त्यात असे दिसून आले, की ते ताणले किंवा पिळले तर त्यातून व्होल्टेजची निर्मिती होते व त्यातील ऊर्जेचे रूपांतर हे विद्युत ऊर्जेत करण्यासाठी नॅनो रॉड्स (सूक्ष्म दंडगोल) वापरले जातात. नॅनो रॉड्स विविध पृष्ठभागांवर लावता येतात त्यामुळे ऊर्जा मिळवणे सोपे जाते. ज्या पृष्ठभागावर नॅनो रॉड्स बसवले आहेत ते ताणले तर त्यातून जास्त व्होल्टेज निर्माण होते. नॅनो रॉड्स हे स्पंदने व रोजच्या आवाजाने निर्माण होणाऱ्या स्पंदनांना प्रतिसाद देतात. त्यानंतर रॉड म्हणजे दंडगोलाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या विद्युत संपर्काचा वापर करून व्होल्टेजची निर्मिती केली जाते, त्यामुळे मोबाईल चार्जिंग होते. संशोधकांनी प्रथमच नॅनो रॉड्सवर काही रसायने फवारून त्यांना झिंक ऑक्साईडसह प्लास्टिकच्या थरात बसवले आहे. जेव्हा रसायनांचे मिश्रण ९० अंशाला तापवले जाते तेव्हा नॅनो रॉड्स सगळ्या प्लास्टिक थरात पसरत जातात. पारंपरिक पद्धतीने सोन्याचा वापर विद्युत संपर्कासाठी केला जात असे; पण या चमूने ॲल्युमिनियमचा वापर केला आहे. या यंत्राने ५ व्होल्ट इतके व्होल्टेज तयार होते, ते फोन चार्जिंगसाठी पुरेसे असते.

## कच्च्या भाज्या खाताय?



चांगले आरोग्य राखण्यासाठी, लोक सहसा आहारात फळे आणि भाज्या समाविष्ट करण्याची शिफारस करतात. पण, जर तुम्हाला ही फळे आणि भाज्या खाण्याची योग्य पद्धत माहीत नसेल, तर तुम्हाला फायदा होण्याऐवजी नुकसान होऊ शकते. खरे तर, काही भाज्यांमध्ये नैसर्गिक टॉक्सिन आणि पचायला कठीण शर्करा असतात. ज्यामुळे एखाद्या व्यक्तीसाठी गॅस्ट्रो नॉमिकल रोगांचा धोका वाढू शकतो. काही भाज्या आणि फळे फ्रूट क्लिनरने धुवून, तुम्ही त्यांच्यातील कीटकनाशके आणि दूषित पदार्थ काढून टाकू शकता. परंतु, तरीही डॉक्टर त्यांना कच्चे खाण्याची शिफारस करत नाहीत.



बटाटा - कच्चा बटाटा तुमची चवच खराब करत नाही, तर तुमच्या पचनाशी संबंधित समस्या देखील निर्माण करू शकतो. कच्च्या बटाट्यामध्ये असलेल्या स्टार्चमुळे पोट फुगणे आणि गॅस होऊ शकतो. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारची गॅस्ट्रो नॉमिकल समस्या टाळण्यासाठी, बटाटे खाण्यापूर्वी ते बेक करणे, भाजणे किंवा शिजवण्याचा सल्ला दिला जातो. कोबी कुटुंबातील भाज्या जसे की फुलकोबी, ब्रोकोली आणि स्प्राऊट्स कच्च्या स्वरूपात खाणे टाळावे. या भाज्यांमध्ये असलेल्या साखरेचे प्रमाण पचण्यास कठीण असते. या भाज्या कच्च्या खाल्ल्याने पोटासंबंधी अनेक समस्या उद्भवू शकतात. जर तुम्ही आधीच थायरॉईडचे रुग्ण असाल, तर या भाज्यांचे सेवन केल्याने तुमच्या समस्या वाढू शकतात. वांग्यामध्ये सोलॅनिन नावाचे संयुग असते जे कॅल्शियमचे शोषण रोखते. शरीरातील सोलॅनिनमुळे मळमळ, चक्कर येणे, उलट्या होणे आणि मुरडा येणे यासह अनेक न्यूरोलॉजिकल आणि गॅस्ट्रो इंटेस्टाइनल समस्या उद्भवू शकतात. वांगी खाण्यास सुरक्षित बनवण्यासाठी ते शिजवून खाणे आवश्यक आहे. लक्षात ठेवा की वांग्याची भाजी बनवण्यापूर्वी चांगल्या क्लिनरच्या मदतीने स्वच्छ करा. कच्चे किंवा अर्धवट शिजलेल्या राजमामध्ये मोठ्या प्रमाणात टॉक्सिन, ग्लायकोप्रोटीन लेक्टिन असते. जे सेवन केल्याच्या काही तासांत एखाद्या व्यक्तीमध्ये मळमळ, उलट्या आणि जुलाब यांसारखी लक्षणे दिसू शकतात. राजमा शिजवण्यापूर्वी ५ तास भिजवल्यास त्यातील हानिकारक घटक नष्ट होण्यास मदत होते.

बरेच लोक मशरूम कच्चे देखील खातात. पण, त्यात असलेली पोषकतत्त्वे चांगली मिळवायची असतील तर ते शिजवून खा. यासाठी तुम्ही तळलेले, ग्रील्ड मशरूमचे सेवन करू शकता. अशा मशरूममध्ये कच्च्या मशरूमपेक्षा जास्त पोटॅशियम असते. मशरूम खाण्यापूर्वी त्यांना चांगल्या फ्रूट क्लिनरने चांगले धुवा, असे तज्ज्ञ सांगतात.

## झोपेबाबत नवं संशोधन



दिवस उगवल्यावर जागे होणे आणि रात्री झोप येणे या क्रिया मानवासह बहुसंख्य प्राणिमात्रांमध्ये अनादि काळापासून चालू आहेत. आपल्या अनेक शरीरक्रिया त्यावर अवलंबून असतात. जीवशास्त्राच्या भाषेत त्याला 'सरकॅडियन र्हिदम' किंवा 'बॉडी क्लॉक' (जैविक घड्याळ) असे म्हणतात. मात्र, दररोज नित्यनेमाने ही क्रिया कशी चालते, याबाबत शास्त्रज्ञांना कायमच कुतूहल होते. प्राण्यांच्या शरीरात अशी कोणती कळ (स्वीच) आहे, ज्यामुळे झोपणे आणि जागे होणे या क्रिया नियंत्रित होतात. त्यावर अनेक वर्षे संशोधन सुरू होते आणि ही जैविक कळ शोधून काढण्यात एका भारतीय वंशाच्या अमेरिकी संशोधकाला यश मिळालेले आहे.

रवी अल्लादा असे या संशोधकाचे नाव असून, ते अमेरिकेच्या इलिनॉइस प्रांतातील नॉर्थ वेस्टर्न विद्यापीठात जीवशास्त्राचे संशोधक आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अनेक वर्षे प्राण्यांच्या झोपेवर संशोधन केले आहे. त्यात फ्रूट फ्लायसारख्या साध्या रचनेचे आणि उंदरांसारख्या जटिल रचनेच्या प्राण्यांचा समावेश होता. जनुकीय रचनेत काही बदल झालेल्या माशांमध्ये झोपेचे नैसर्गिक चक्र बिघडलेले आढळून आले.

त्यांचा अधिक अभ्यास केल्यावर लक्षात आले की मेंदूच्या चेतापेशींना ठराविक वेळी झोपण्याचे आणि जागे होण्याचे संदेश पोहोचवले जातात. त्यात पेशींमधील सोडियम आणि पोटॅशियम चॅनेल्सची (वाहिन्या) भूमिका महत्त्वाची असते. दिवस उगवल्यावर या चेतापेशींच्या सोडियम चॅनेल्समध्ये अधिक क्रिया दिसून येते, तर दिवस मावळताना पोटॅशियम चॅनेल्समधील प्रक्रियेत वाढ झालेली दिसून आली. यावरून शास्त्रज्ञांनी असा निष्कर्ष काढला की, चेतापेशींमधील ही सोडियम आणि पोटॅशियम चॅनेल्स एखाद्या सायकलच्या पेडल्सप्रमाणे क्रमाक्रमाने प्राण्याचे झोपणे आणि जागे होणे नियंत्रित करतात. रवी अल्लादा यांच्या मते जर उंदरांमध्ये ही प्रक्रिया अस्तित्वात आहे तर ती माणसांमध्येही असणार. कारण, दोघांचीही शरीररचना बरीचशी सारखीच आहे. सध्या निद्रानाश आणि झोपेसंबंधी अन्य विकारांनी मानवी आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे. अनेक कंपन्यांमध्ये दिवस-रात्र पाळ्यांमध्ये (शिफ्टस्) काम केल्यानेही झोपेचे हे नैसर्गिक चक्र बिघडत आहे. अशा अनेक व्याधींवर या संशोधनातून उपाय शोधणे शक्य होईल.

## क्युरिऑसिटीची चाके झिजली

मंगळ ग्रहावर 'नासा'ची अनेक रोव्हर फिरत आहेत. त्यापैकी एक आहे क्युरिऑसिटी रोव्हर. बारा वर्षांपासून मंगळभूमीवर वावरत असलेल्या या रोव्हरच्या चाकाला मोठे भोक पडले असल्याचे दिसून आले आहे. हे एकच भोक पडलेले नसून, अशी अनेक छिद्रे रोव्हरच्या चाकांना पडलेली आहेत. ५ ऑगस्ट २०१२ मध्ये हे रोव्हर मंगळभूमीवर उतरले होते. ते केवळ दोन वर्षे काम करील, अशी सुरुवातीची अपेक्षा होती. मात्र, हे रोव्हर बरेच टिकाऊ निघाले आणि बारा वर्षांनंतरही ते अद्याप काम करीत आहे.



या लाल ग्रहावर क्युरिऑसिटी रोव्हरने आपले ४३२३ मंगळ कालगणनेचे दिवस व्यतीत केले आहेत. गेल क्रेटर असे नाव दिलेल्या मोठ्या विवराच्या चारही बाजूने या रोव्हरने आतापर्यंत ३२ किलोमीटरपेक्षाही अधिक प्रवास केला आहे. सुरुवातीला हे रोव्हर या विवरातच उतरले होते. त्याच्या साहाय्याने खगोलशास्त्रज्ञांनी या विवराचा अभ्यास केला. मंगळावर एकेकाळी सूक्ष्म जीवांच्या स्वरुपात का होईना जीवसृष्टी होती का याचा तपास यावेळी करण्यात येत होता. तसेच तेथून सूर्याच्या मागील हिश्श्याचेही निरीक्षण करण्यात आले होते. या रोव्हरने अनेक अनोख्या गोष्टीही शोधल्या आहेत. त्यामध्ये पुस्तकाच्या आकाराचा एक दगड आणि एका खनिज फुलाचा समावेश आहे. क्युरिऑसिटीच्या मार्स हँड लेन्स इमेजरने त्याच्या चाकांची छायाचित्रे टिपली आहेत. ती 'नासा'ने अलीकडेच प्रसिद्ध केली. त्यामधून दिसून येते की दीर्घ प्रवासानंतर आता या रोव्हरची चाके झिजून त्यामध्ये छिद्रे निर्माण झाली आहेत. हे मोठे भोक सर्वप्रथम कधी बनले हे स्पष्ट झाले नाही. अर्थात, चाकांची अशी अवस्था झाली असली तरीही या रोव्हरचे काम सुरूच आहे. ते भविष्यातही असेच सुरू राहील, असे संशोधक एश्ले स्ट्रुप यांनी सांगितले.

## जगावेगळी 'जेली'

संशोधकांनी समुद्रातील खोल पाण्यात राहणाऱ्या कॉम्ब जेलीबाबत एक अनोखे निरीक्षण केले आहे. ही जेली दुखापत झाल्यावर आपले अंतर्गत अवयव एकमेकांमध्ये मिसळून संयुक्त चेतासंस्था व पोटांची निर्मिती करते. असा असामान्य बदल यापूर्वी अन्य कोणत्याच प्रजातीमध्ये पाहण्यात आलेला नसल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. प्रयोगशाळेत अपघातानेच त्यांची ही प्रवृत्ती दिसून आली.

ब्रिटनच्या एक्सेटर युनिव्हर्सिटीतील तसेच जपानच्या ओकाझाकी येथील नॅशनल इन्स्टिट्यूटस् ऑफ नॅचरल सायन्सेसमधील क्रमिक विकास जीवशास्त्रज्ञ केई जोकुरा यांनी याबाबतची माहिती दिली आहे. ते म्हणाले, अशा जेलींना पाहून आम्ही आश्चर्यचकित आणि उत्साहित झालो. मी तत्काळ अशा फ्युज्ड कॉम्ब जेलीज बाहेर काढल्या व त्या अन्य सहकाऱ्यांना दाखवल्या. कॉम्ब जेलींना टेनोफोर्स असेही नाव आहे. हा शंभरपेक्षाही अधिक प्रजातींचा एक मोठा समूह आहे. त्यामध्ये ब्लॉबसारख्या छोट्या, कंगव्याच्या आकाराचे टेंटिकल्स असलेल्या जिलॅटिनसम जीवांचा समावेश आहे. होतो. हे जीव पृथ्वीवरचे आहेत की परग्रहावरचे, असे कधी कधी वाटावे, इतके ते अनोखे आहेत.



जेलीफिशसारखे दिसणारे हे जीव खोल समुद्रात कधी कधी प्रकाशाने चमकत असतात. त्यांच्या पारदर्शक शरीरातील काही पेशी असा प्रकाश निर्माण करतात. खोल समुद्रातील सर्वात अनोख्या जलचरांपैकी हे जीव आहेत. ते जीवसृष्टीच्या विकासातील सर्वात प्राचीन पूर्वजांपैकी असल्याचेही मानले जाते. याबाबतच्या संशोधनाची माहिती करंट बायोलॉजी या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली



नवकार महामंत्राचा सामुहिक जाप करून आनंद आशिष प्रार्थना मंडळाच्या वतीने अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी यासाठी भगवान महावीर स्वामींच्या चरणी विशेष प्रार्थना करण्यात आली.

## अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी नवकार महामंत्राचा सामुहिक जाप

नगर – णमो अरिहंताणं णमो सिद्धाणं... या नवकार महामंत्राचा सामुहिक जाप करत आनंद आशिष प्रार्थना मंडळाच्या वतीने माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी यासाठी भगवान महावीर स्वामींच्या चरणी विशेष प्रार्थना करण्यात आली. आनंद आशिष प्रार्थना मंडळाच्या वतीने भक्तिपूर्ण वातावरणात अरुण जगताप यांच्या निवासस्थानी नवकार महामंत्राचा जाप करण्यात आला. यावेळी आराध्य जगताप याने आपल्या आजोबांच्या स्वास्थ्यासाठी मनोभावे भगवान महाविरांकडे प्रार्थना करत नवकार मंत्राचा जाप केला. गेल्या २८ वर्षांपासून अविरतपणे अहिल्यानगर शहरात आनंद आशिष प्रार्थना मंडळाचा साप्ताहिक नवकार महामंत्रचा जाप सुरु आहे.

यावेळी मंडळाचे अजित कर्नावट, राजेंद्र बलदोटा, राजेंद्र ताथेड, दीपक बोथरा, नरेंद्र बाफना, विशाल शेटीया, कचरदास लुंकड, राजेंद्र छल्लाणी, सचिन कटारिया, धनराज संचेती, अशोक बलदोटा, अलका मुंदडा, डॉ. विजय भंडारी, सुमतीलाल कोठारी, संजय चोपडा, रमण देसर्डा, पारस चोरडिया, अनिल कोठारी, सुवर्णा जगताप, शितल जगताप, दुग्गड अनिल, दुग्गड अरुण, योगेश दाणी आदी उपस्थित होते.

यावेळी अजित कर्नावट म्हणाले, सर्वांसाठी कायम धाऊन जाणरे व कायम पाठबळ देणारे अरुण जगताप यांची प्रकृती बिघडल्याने त्यांच्यावर पुण्यात उपचार सुरु आहेत. त्याच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी यासाठी आम्ही नवकार मंत्राचा जाप केला आहे. काकांना दवा व संतांची दुवा याने नक्कीच बरे वाटणार असून ते लवकरच ठणठणीत बरे होऊन पुन्हा आपल्या नगरमध्ये येतील.

राजेंद्र बलदोटा म्हणाले, काकांच्या स्वास्थ्यासाठी सर्वत्र मोठ्याप्रमाणात पूजाअर्चा केली जात आहे. आनंद आशिष प्रार्थना मंडळाच्या वतीनेही नवकार महामंत्राचा जाप काकांच्या घरात केला आहे. नवकार महामंत्रात मोठी ताकद असून या मंत्राच्या जापमुळे त्यांना १०० टक्के बरे वाटणार आहे.

## माजी आ.अरुणकाका जगताप यांच्या प्रकृती सुधारण्यासाठी दातरंगे मळा येथील भाविकांचे भगवान श्री दत्तात्रयाला साकडे

### श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान (ट्रस्ट) च्या दत्त मंदिरात महाआरती



माजी आ.अरुणकाका जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी दातरंगे मळा येथील भाविकांचे भगवान श्री दत्तात्रयाला साकडे घातले.

नगर – माजी आमदार अरुण जगताप यांच्यावर पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून, काकांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी. यासाठी दातरंगेमळा परिसरातील दत्त कॉलनी येथील श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान (ट्रस्ट)च्या दत्त मंदिरात भाविकांनी भगवान श्री दत्तात्रयाला साकडे घातले. तसेच भगवान श्री दत्तात्रेय यांची महाआरती केली. याप्रसंगी प्रा.अरविंद शिंदे, मंदिराचे अध्यक्ष चंद्रकांत सब्बन, उपाध्यक्ष रमेश गुंडू, अजय म्याना, दीपक गुंडू, आदित्य शिंदे, सतीश चिंता, विजय सब्बन, अंकुश बुरा, ऋषी वाडेकर, अनमोल वाडेकर, शुभम बुरा, किरण कोडम, हरिभाऊ येलदंडी, शरद दातरंगे, शुभम येनगुपटला, प्रीतम काळे, अवि पंतम, राकेश भंडारी, अमोल इप्पलपेल्ली, महेश गुड्डू, किरण कोडम, श्रीनिवास इप्पलपेल्ली, बाळू सराईकर, योगेश राऊत, सोहम घोरपडे, शुभम भंडारी, बालाजी बुरा, विशाल गाजुल, अंबादास दुड्गु, ऋषिकेश दस्कन, प्रणव इप्पलपेल्ली, आदेश गुंडू, महेश बड्डू, प्रशांत जंगम, विनोद निमसे, चिट्याल, श्रीकांत येनगूपटला, अमोल इप्पलपेल्ली, रामा एकलदेवी, सतीश इप्पलपेल्ली, सत्यनारायण एकलदेवी आदींसह महिला व परीसरातील नागरिक उपस्थित होते.

प्रा.अरविंद शिंदे म्हणाले, दातरंगे मळा येथील श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर मंदिर जागृत देवस्थान आहे. दातरंगे मळा परिसरातील भाविकांनी काकांच्या उत्तम आरोग्यासाठी भगवान श्री दत्तात्रयाला साकडे घातले आहे. व मनोभावे प्रार्थना केली आहे. लवकरच काकांच्या तब्येतीत सुधारणा होऊन नागरिकांच्या सेवेत काका पुन्हा दाखल होतील. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## ‘रामकृष्ण संस्था’ व सभासदांच्या हितासाठी काम करण्याची संधी द्या

### अपक्ष उमेदवार विष्णू बन्सीलाल सारडा यांचे मतदारांना जाहीर आवाहन



नगर – श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी ही छोट्या व्यापाऱ्यांची, उद्योजकांची आणि कष्टकऱ्यांची मेहनतीची ठेव आहे. या संस्थेच्या व सभासदांच्या हितासाठी या निवडणुकीत काम करण्याची संधी सभासदांनी द्यावी, असे आवाहन सर्वसाधारण मतदार संघातील अपक्ष उमेदवार विष्णू बन्सीलाल सारडा यांनी केले आहे.

मी तुमच्यातलाच एक छोटा व्यापारी, तुमच्यातलाच एक मेहनती माणूस आहे. आज आपल्या सोसायटीला गरज आहे अशा नेतृत्वाची, जे स्वार्थ न ठेवता, राजकारण न करता, प्रामाणिकपणे प्रत्येक सभासदासाठी उभं राहील. म्हणूनच मी स्वतंत्रपणे तुमच्यासमोर उभा आहे. मी कोणाच्याही गटाचा नाही तसेच कोणाच्याही दबावाखाली येणारा नाही. माझे ध्येय हे तुमच्या पैशाचं पूर्ण संरक्षण, सर्व सभासदांना वेळेवर आणि न्यायाने मदत, सोसायटीचं पारदर्शक व सुरळीत व्यवस्थापन आणि तुमच्यासाठी नेहमी उपलब्ध असणं हे आहे. त्यामुळे आपण सगळे मिळून सोसायटीला बळकट करू शकतो. फक्त योग्य व्यक्तीला योग्य संधी द्यायला हवी. म्हणूनच, रिक्षा या चिन्हावर शिक्का मारुन मला निवडून देवून काम करण्याची संधी द्यावी, असेही अपक्ष उमेदवार सारडा यांनी म्हटले आहे.

## अॅथलेटिक्स खेळाडू उज्वला राजे यांनी दिल्ली येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मिळविले सुवर्ण व रौप्य पदके



अहिल्यानगरच्या अष्टपैलू अॅथलेटिक्स खेळाडू उज्वला राजे यांनी दिल्ली येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मोठे यश संपादन करत सुवर्ण व रौप्य पदक पटकावले.

नगर – अहिल्यानगरच्या अष्टपैलू अॅथलेटिक्स खेळाडू रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्रेटीच्या सेक्रेटरी व सेंट थॉमस स्कूलच्या क्रीडा शिक्षिका उज्वला राजे यांनी दिल्ली येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत यश संपादन करत सुवर्ण व रौप्य पदक पटकावले आहेत. खेलो मास्टर गेम्स नॅशनल मार्फत नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या कॉमनवेल्थ ग्राउंड क्रीडा स्पर्धेत उज्वला राजे यांनी महिलांच्या ४५ ते ५० वयोगटात २०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक तर १०० मीटर धावणे स्पर्धेत रौप्य पदक पटकावत अहिल्यानगरचे नाव दिल्लीत गाजवले. उज्वला राजे या विधीज्ञ अभय राजे यांच्या पत्नी आहेत.

उज्वला राजे यांनी नोव्हेंबर महिन्यात नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्येही यश संपादन करत रनिंग, थाळीफेक आणि उंच उडी मध्ये सुवर्ण पदकांची कमाई केली होती. त्यामुळे त्यांची दिल्ली येथील खेलो मास्टर गेम स्पर्धेसाठी निवड झाली होती. या स्पर्धेतही त्यांनी चमकदार कामगिरी केली आहे. मागच्या वर्षीही उज्वला राजे यांनी दिल्लीतील ही स्पर्धा गाजवत दुहेरी मुकुट संपादन केले होते.

उज्वला राजे या लहानपणापासूनच अष्टपैलू खेळाडू आहेत. शाळा व महाविद्यालयात त्यांचा बेस्ट अॅथलेटिक्स खेळाडू व आदर्श विद्यार्थिनी म्हणून गौरव करण्यात आला होता. लेखक रत्नाप्पा कुंभार, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्तेही त्यांचा गौरव करण्यात झाला आहे. दूरदर्शनवर ’हुकमाची राणी’ या शोमध्ये त्यांनी मुकुटही संपादन केला आहे. सध्या उज्वला राजे या नगरच्या रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्रेटीच्या सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहेत. आपल्या उज्वल यशाचे श्रेय त्यांनी आई–वडील, सासू–सासरे, नणंद, भाऊ, दिर व पती अॅड. अभय राजे व कोच दिनेश भालेराव यांना दिले आहे.



### एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते डॉ. दीपक हरके पुरस्काराने सन्मानित

जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांना भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी भारताचे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते त्यांच्या दिल्ली येथील ५ सफदरजंग लेन निवासस्थानी इंटरनॅशनल बुक ऑफ ऑनर्स अँड रेकॉर्ड, इंग्लंडच्यावतीने ऑनर सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी इंटरनॅशनल बुक ऑफ ऑनर्स अँड रेकॉर्ड, इंग्लंडचे संस्थापक चेअरमन डॉ. दिवाकर उपस्थित होते.

## पितृछत्र हारवलेल्या व गरजुवंत विद्यार्थ्यांना मदत करुन शैक्षणिक क्षेत्रात निस्वार्थ काम करणार : तुषार बोरुडे



तुषार बोरुडे यांच्याकडून अहिल्यानगर येथील बालघर प्रकल्प येथील ४० अनाथ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटण्यात आले.

नगर – काही विद्यार्थ्यां– मध्ये गुण – हुशार असुन केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेणे कठीण होत. म्हणुन तुषार बोरुडे यांच्याकडून अहिल्यानगर येथील बालघर प्रकल्प येथील ४० अनाथ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबले आहे त्या विद्यार्थ्यांसाठी अनाथ सेवक या संस्थेमार्फत आम्ही प्रामाणिक सेवा करत आहोत. अनाथ गरजूंना वस्तूंचे तसेच कपड्यांचे वाटप, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, रक्तदान शिबिर, अंध अपंगांना मदत, अनाथ आश्रमात जाऊन वाढदिवस साजरे करणे असे अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत. या उपक्रमांनंतर आता शैक्षणिक मदत हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन अडलेल्यांना मदतीचा हात देऊन त्यांचे शिक्षण पुढे सुरू ठेवण्याचे आदर्श कार्य तुषार बोरुडे या युवकाने हाती घेतले आहे. कोणत्याही परिस्थिती मध्ये होतकरू, गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये यासाठी आम्ही फुल न फुलांची पाकळी मदत करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

विविध प्रकारच्या परिक्षेत यश संपादन करायचे असेल तर आत्मविश्वास, जिद्द आणि कठोर मेहनत करणे आवश्यक आहे. स्वत:वर विश्वास ठेवून मनाची तयारी केली तर निश्चित यश प्राप्त होईल. घर व परिसर आपला स्वच्छ राहिला पाहिजे यासाठी विद्यार्थ्यांनी दक्ष राहावे. विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहावे. स्वच्छतेचे आणि व्यसनमुक्तीचे दूत म्हणून विद्यार्थ्यांनी समाजाच्या हितासाठी काम करावे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोरुडे यांचे सांगितले.

तुषार बोरुडे यांचे काम कौतुकास्पद आहे. अतिशय कमी वयामध्ये त्यांनी समाजसेवेचा वसा हाती घेतला आहे. त्यांचे समाजकार्य असेच अखंड चालत राहो. आजच्या युवा पिढीने त्यांचा आदर्श घ्यावा, असे बालघर प्रकल्प अहिल्यानगरचे संचालक युवराज गुंड म्हणाले.

## ‘जलव्यवस्थापन कृती पंधरवडा’ निमित्त स्वच्छ, सुंदर माझे कार्यालय अभियान

नगर – जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या ‘जलव्यवस्थापन कृती पंधरवडा’ निमित्त जलसंपदा विभागातील सर्व कार्यालयांमध्ये स्वच्छ, सुंदर माझे कार्यालय अभियानाद्वारे कार्यालय व परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

अहिल्यानगर येथे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता ज.म. पाटील, स्वप्नील काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही मोहिम राबविण्यात आली.

उर्ध्व प्रवरा धरण विभाग, उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, लघु पाटबंधारे विभाग क्र. २ येथे कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे, पदीप हापसे, गणेश हापसे यांच्या उपस्थितीमध्ये विभागीय कार्यालय व वसाहतीम धील उपविभागात कर्मचारी तसेच आनंदनवन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोहिमेत सहभाग नोंदवला.

श्रीगोंदा तालुक्यामध्ये कुकटी पाटबंधारे विभागीय कार्यालय व उप विभागामध्ये कार्यकारी अभियंता पी.व्ही. घोरपडे तर कर्जत तालुक्यामध्ये कार्यकारी अभियंता यु.डी. धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्वच्छता मोहिम यशस्वीरित्या राबविण्यात आली.

स्वच्छ, सुंदर माझे कार्यालय अभियानात मंडळ कार्यालय, ९ विभागीय कार्यालये ४५ उपविभाग व ५० शाखा कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवत कार्यालय, कार्यालयाचा परिसर स्वच्छ करत श्रमदान केले.

## शिकाऊ भरती मेळाव्याचे २१ एप्रिल रोजी आयोजन

नगर – राष्ट्रीय शिकाऊ मेळाअंतर्गत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बुरूडगाव रोड, अहिल्यानगर येथे २१ एप्रिल रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या वेळेत शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिकाऊ उमेदवारी मिळवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य के.ए.जहागीरदार यांनी केले आहे.

मेळाव्याच्या ठिकाणी उमेदवारांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लिंक अथवा क्यू आर कोडद्वारे नोंदणी करावी. तसेच दहाणी उत्तीर्ण, आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड आदी मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह मेळाव्यास उपस्थित रहावे असेही कळविण्यात आले आहे.





गंगा उद्यानमागील क्रीडा संकुलाचे सुरु असलेले काम तसेच या कामाचे संकल्पचित्र.

## गंगा उद्यानमागील क्रीडा संकुलाचे काम सुरू; ३० टक्के काम पूर्ण, प्रकल्प वेळेत पूर्ण करणार

### आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – नागरिकांना, खेळाडूंना चांगल्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सावेडी उपनगर परिसरात क्रीडा संकुलाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. गंगा उद्यानजवळ सुमारे या क्रीडा संकुलाचे काम सुरू करण्यात आले आहे. येत्या दोन वर्षात वेळेत संकुल उभारणीचे काम पूर्ण होणार आहे. सद्यस्थितीत ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. कामाला वेग देण्याच्या सूचना आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिल्या आहेत.

यशवंत डांगे यांनी सावेडी क्रीडा संकुलाच्या कामाचा आढावा घेतला. आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारातून या प्रकल्पासाठी ६ कोटी रुपये निधी उपलब्ध झाला आहे. या क्रीडा संकुलात विविध प्रकारच्या इनडोअर व आऊटडोअर क्रीडा प्रकारांसाठी मैदाने व सुविधा देण्यात येणार आहेत. तसेच, सावेडी उपनगर परिसरात प्रथमच मनपाच्या जलतरण तलावाची उभारणी केली जाणार आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील व्यक्तींना या सुविधांचा लाभ घेता येणार आहे.

क्रीडा संकुलाचे काम सुरू आहे. सद्यस्थितीत ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पात आणखी काही कामे करावी लागणार आहेत. त्यासाठी अतिरिक्त निधी लागणार आहे. त्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्यामार्फत राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने कामाचे नियोजन करावे, अशा सूचना यशवंत डांगे यांनी दिल्या आहेत.

